रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक ७०
www.ramprahar.com

शनिवार, २७ सप्टेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

बेकायदेशीर ॲप आधारित वाहनांवर कारवाईचा बडगा/२
शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा/५
पेणमध्ये बालविवाहविरोधी जनजागृती मोहीम/७

## राज्यात मान्सूनच्या परतीचा प्रवास लांबला



**पुणे** : राज्यात पावसामुळे मोठे नुकसान झाले आहे. अशातच महाराष्ट्रातील मान्सूनच्या परतीचा प्रवास लांबला आहे. साधारणपणे १ ऑक्टोबरच्या आसपास मान्सून महाराष्ट्रातून माघार घेतो, मात्र हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार यंदा मान्सून ५ ऑक्टोबरपूर्वी राज्यातून परतणार नाहीये. बंगालच्या उपसागरामध्ये कमी दाबाचे क्षेत्र निर्माण झाले आहे. त्यामुळे पुढील काही दिवस राज्यात पावसाचा जोर आणखी वाढणार असल्याचा इशारा हवामान खात्याकडून देण्यात आला आहे. पुढील तीन ते चार दिवस महाराष्ट्र मुसळधार पावसाची शक्यता आहे. राज्यात नांदेड, लातूर, धाराशिव, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, रायगड, ठाणे, मुंबई शहर, मुंबई उपनगर या नऊ जिल्ह्यांसह पुणे घाट, सातारा घाट आणि कोल्हापूर घाट परिसरात २७ सप्टेंबर रोजीसाठी ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे.

# पंतप्रधान मोदींकडून महाराष्ट्रातील पूरग्रस्तांना भरीव मदतीचे आश्वासन

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची माहिती



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

महाराष्ट्रात विशेषतः मराठवाड्यामध्ये गंभीर पूरस्थिती निर्माण झाली. अतिवृष्टीमुळे लाखो हेक्टरवरील शेतीचे नुकसान झाले असून नागरिकांच्या घरात पाणी शिरल्याने अनेकांचे संसार उघड्यावर आले आहेत. या पार्श्वभूमीवर दिल्ली दौऱ्यावर गेलेले राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी (दि.२६) पंतप्रधान नरेंद्र मोदींची भेट घेऊन चर्चा केली. या वेळी पंतप्रधानांकडून भरीव मदतीचे आश्वासन मिळाल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

पत्रकारांशी बोलताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, माझ्या वतीने आणि दोन्ही उपमुख्यमंत्री यांच्या सहीने पंतप्रधानांना एक निवेदन दिले आहे. त्यांना एकूण महाराष्ट्रातील पूरपरिस्थितीची कल्पना दिली. कशा पद्धतीचे नुकसान झाले आहे त्याबद्दल सांगितले. आम्हाला एनडीआरएफच्या माध्यमातून जेवढी जास्तीत जास्त मदत करता येईल तेवढी आपण करा, अशी विनंती केली. त्यांनीदेखील सकारात्मकता दाखवली आहे. लवकरात लवकर प्रस्ताव येऊ द्या. प्रस्ताव आल्यावर कार्यवाही करू, असे सांगितले. शक्य तेवढ्या जास्त मदतीचे आश्वासन पंतप्रधान मोदींनी दिले आहे.

कर्जमाफीसंदर्भात आम्ही आमच्या घोषणापत्रात आश्वासन दिले आहे. त्या आश्वासनाची पूर्तता आम्ही करणार आहोत. ती कधी करायची आणि कशी करायची या संदर्भात एक समिती तयार झालेली आहे. ती समिती अभ्यास करत आहे. कर्जमाफी वारंवार करता येत नाही. त्यामुळे ती करत असताना अधिक प्रभावी कशी करता येईल याचा प्रयत्न आहे. आपल्याला कल्पना आहे की, आता खरीपासाठी घेतलेले कर्ज फेडण्याची वेळ पुढच्या वर्षी येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना तातडीने त्यांच्या खात्यात मदत जाणे महत्त्वाचे आहे, असे मुख्यमंत्री फडणवीस यांनी स्पष्ट केले.

पुन्हा एकदा कमी दाबाचे क्षेत्र तयार होत असल्यामुळे २७ किंवा २८ सप्टेंबर या दरम्यान मध्य महाराष्ट्रात किंवा महाराष्ट्राच्या उर्वरित काही भागात अतिवृष्टी होऊ शकते. सरकारही अलर्ट मोडवर आहे. नागरिकांनी जी काही सतर्कता घेता येईल त्यांच्या परीने ती त्यांनी घ्यायला हवी, असे आवाहन मुख्यमंत्री फडणवीस यांनी या वेळी केले.

## आमदार प्रशांत ठाकूर यांच्या उपस्थितीत पाणीपुरवठा योजनेच्या कामांचा आढावा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

न्हावा-शेवा वाढीव पाणीपुरवठा योजनेच्या कामांचा आढावा घेण्यासाठी पनवेल महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे यांच्या अध्यक्षतेखाली आणि आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांसोबत शुक्रवारी (दि. २६) बैठक झाली. या वेळी संबंधित विषयांवर सखोल चर्चा झाली.

या बैठकीस पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड सरचिटणीस तथा माजी नगरसेवक नितीन पाटील, माजी नगरसेवक अनिल भगत यांच्यासह अधिकारी उपस्थित होते.

या बैठकीत वाढीव न्हावा-शेवा पाणीपुरवठा योजना टप्पा-३ या योजनेत सुरू असलेल्या कामांच्या प्रगतीचा सविस्तर आढावा घेण्यात आला. या योजनेमुळे पनवेल महापालिकेला प्रति दिन २२८ दशलक्ष लिटर पाणी मिळणार आहे.

## केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांना निवेदन



महाराष्ट्रात झालेली अतिवृष्टी आणि त्यामुळे शेतकऱ्यांचे झालेले प्रचंड नुकसान याबाबत सविस्तर निवेदन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केंद्रीय गृह व सहकारमंत्री अमित शाह यांना दिले. महाराष्ट्रातील नैसर्गिक आपत्तीग्रस्त शेतकऱ्यांसाठी एनडीआरएफमधून भरीव मदत देण्यात यावी, अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली. पूरग्रस्तांना एनडीआरएफमधून मदत मिळावी यासाठी केंद्र सरकारला सविस्तर प्रस्ताव लवकरच पाठवणार आहोत, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी या निवेदनात म्हटले आहे. त्यांच्यासमवेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेही उपस्थित होते.

## नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला 'दिबां'च्या नावास केंद्र सरकार अनुकूल



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नवी दिल्ली येथे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची भेट घेतली. या भेटीनंतर ते म्हणाले की, नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ आणि मेट्रो-३चे उद्घाटन लवकरच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते केले जाईल. नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव दिले गेले पाहिजे, असे आमचे मत आहे. या संदर्भात आम्ही केंद्र सरकारला प्रस्ताव दिला आहे. या नावाला केंद्र सरकारची अनुकूलता असून त्याबाबत प्रक्रिया चालू आहे. केंद्र सरकार आणि आम्ही या विमानतळाला 'दिबां'चेच नाव देऊ.

## एमपीएससी परीक्षा पुढे ढकलली

**मुंबई** : महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून (एमपीएससी) घेण्यात येणारी महाराष्ट्र नागरी सेवा राजपत्रित संयुक्त पूर्व परीक्षा २८ सप्टेंबरऐवजी आता ९ नोव्हेंबरला घेण्यात येणार आहे. राज्यातील विविध भागांमध्ये निर्माण झालेली पूरपरिस्थिती लक्षात घेऊन ही परीक्षा पुढे ढकलण्यात आली आहे. या संदर्भात राज्य सरकारच्या वतीने महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला विनंती अर्ज पाठवण्यात आला होता.

## दिवाळीनिमित्त अंगणवाडी सेविका, मदतनीसांना २००० रुपये भाऊबीज भेट

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्यातील एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत कार्यरत अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना दिवाळीनिमित्त दोन हजार रुपये भाऊबीज म्हणून भेट देण्यात येणार आहे. यासाठी एकूण ४०.६१ कोटींचा निधी उपलब्ध करून दिला असल्याची माहिती महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे यांनी दिली.

अंगणवाडी सेविका व मदतनीस या महिला व बालकांच्या संगोपनासाठी, पोषणासाठी आणि सर्वांगीण विकासासाठी महत्वाची सेवा बजावत आहेत. त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी ही भाऊबीजेची रक्कम भेट स्वरूपात मंजूर केली आहे. प्रत्येक अंगणवाडी सेविका व मदतनीस ही आपल्या समाजातील खरी 'शक्ती' असून, त्यांचा सण आनंदी व्हावा हीच आमची भूमिका आहे, असे मंत्री तटकरे यांनी सांगितले.

## निवडक

### सोनम वांगचुक यांना अटक; हिंसाचारप्रकरणी कारवाई



**लेह** : लडाखमध्ये झालेल्या हिंसाचार प्रकरणात पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचूक यांना अटक करण्यात आली आहे. या हिंसाचारात चार लोकांचा मृत्यू, तर ७० लोक जखमी झाले होते. हिंसाचारादरम्यान आंदोलकांनी दगडफेक, जाळपोळही केली होती. वांगचुक यांच्यावर जमावाला उकसवणारी वक्तव्य केल्याचा आरोप आहे.

### आशिया चषकासाठी उद्या भारत-पाकिस्तान फायनल

**दुबई** : येथील आंतरराष्ट्रीय क्रिकेट स्टेडियमवर रंगलेल्या सुपर फोरमधील लढतीत पाकिस्तानच्या संघाने बांगलादेशला पराभूत करत फायनलचे तिकीट पक्के केले आहे. आता २८ सप्टेंबरला आशिया कप स्पर्धेत तिसऱ्यांदा भारत-पाक यांच्यात सामना रंगेल. विशेष म्हणजे आशिया कप स्पर्धेच्या आतापर्यंतच्या ४१ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच भारत-पाक हे दोन संघ जेतेपदासाठी एकमेकांविरुद्ध भिडताना दिसतील.

# कर्मवीरांच्या विचारांची पिढी घडवूया -लोकनेते रामशेठ ठाकूर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सगळ्यांनी एकत्र येऊन काम केले, तर मोठी शक्ती निर्माण होऊ शकते. त्यानुसार एकीचे बळ, सहकाराची भावना, श्रमाला प्रतिष्ठा आणि कर्मवीर अण्णांच्या विचारांनी प्रेरित होणारी भावी पिढी घडण्याची आवश्यकता असल्याचे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले.

पनवेल तालुक्यातील गव्हाण कोपर येथील छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ. भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये संस्थेचे संस्थापक, थोर शिक्षणमहर्षी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचा १३८वा जयंती सोहळा व त्या निमित्त लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांसाठी कै.ज.आ. भगत पारितोषिक वितरण समारंभ शुक्रवारी (दि. २६) उत्साहात झाला. त्या वेळी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

आपल्या भाषणात लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी या विद्यालयाचा माजी विद्यार्थी म्हणून असलेल्या आठवणींना उजाळा दिला. आम्ही व्यासपीठावर बसलेल्या प्रत्येकाने संघर्षमय आणि प्रतिकूल परिस्थितीतून विकास साधला आहे. आता आपल्याला सर्व भौतिक व शैक्षणिक सुविधा उपलब्ध आहेत. संस्थेचा कोणताही उपक्रम आपण आपल्या विद्यालयात प्रथम राबवतो. येणाऱ्या काळात रयत शिक्षण संस्थेच्या विद्यार्थ्यांनी विविध क्षेत्रांमध्ये प्राविण्य संपादन करावे, असेही ते म्हणाले.


प्रमुख वक्ते 'हेडाम' या सुप्रसिद्ध कादंबरीचे लेखक नागू विरकर यांनी कर्मवीर अण्णांच्या संस्थेत आपण शिकल्याचा अभिमान व्यक्त करून आयुष्यातील अत्यंत संघर्षमय आणि खडतर जीवन प्रवासाचे अनुभव कथन केले.

विद्यालयाच्या स्थानिक शाळा समितीचे चेअरमन व रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य अरुणशेठ भगत, वाय.टी. देशमुख, महेंद्र घरत यांनीही विचार मांडले. घरत यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या दातृत्वाचा गुण आपण घेतल्याचे सांगून गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिकासाठी पाच लाख रुपये विद्यालयास देण्याचे जाहीर केले.

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी संस्थेकडे ठेवलेल्या १० लाख २५ हजार रुपयांच्या कायम ठेवीवरील व्याजातून आलेल्या रकमेतून गुणवंत विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते रोख पारितोषिके वितरीत करण्यात आली. विद्यालयाच्या माजी उपशिक्षिका द्रौपदी रमेश वर्तक यांनी विविध शिष्यवृत्ती परीक्षांमधील विद्यार्थ्यांना प्रत्येकी एक हजार रुपये याप्रमाणे पारितोषिके प्रदान केली, तर लायन्स क्लबच्या वतीने दीपा मोर्या यांनीही दहावीत प्रथम विद्यार्थ्यास एक हजार रुपयांचे पारितोषिक दिले.

रयत शिक्षण संस्थेच्या उच्च शिक्षण विभागाचे सहसचिव डॉ.शिवलिंग मेनकुदळे, ऑडिट विभागाचे सहसचिव डॉ.राजेंद्र मोरे आणि माध्यमिक विभागाचे सहसचिव बंडू पवार या तिन्ही सहसचिवांनी या वेळी विद्यालयास भेट दिली. त्यांचे सन्मानचिन्ह व रोप भेट देऊन स्वागत करण्यात आले. (पान २ वर..)

## रायगडात पीक परिस्थिती समाधानकारक



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात पडलेल्या समाधानकारक पावसामुळे भातशेती बहरली आहे. सध्या हळव्या जातीचे भात पासावण्याच्या अवस्थेत आहे. भात पिकावर कोणत्याही रोगाचा प्रादुर्भाव नाही.

रायगड जिल्ह्यात ९१५२१.०३ हेक्टर इतके सरासरी भात लागवड क्षेत्र आहे. यंदा ७०४४६.९२ हेक्टर क्षेत्रावर भात पिकाची लागवड करण्यात आली आहे. पिकाची वाढ चांगली झाली असून उशिरा लागवड झालेल्या ठिकाणी अल्प प्रमाणात निळे भुंगेरे, खोडकिडा, तपकिरी तुडतुडे या किडीचा व कडा करपा या रोगाचा प्रादुर्भाव झाला होता. जिल्ह्यातील अलिबाग, उरण, पेण, महाड, माणगाव, पोलादपूर, मुरूड व श्रीवर्धन या तालुक्यांमध्ये हा प्रादुर्भाव झाला होता. कृषी विभागाने गाव बैठकांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना किड रोग नियंत्रणाबद्दल मार्गदर्शन केले.

भात पिकाची वाढ चांगली झाली आहे. सध्या हळव्या जातीचे भात पासावण्याच्या अवस्थेत आहे. कोणत्याही रोगाचा प्रादुर्भाव नाही, अशी माहिती कृषी विभागातर्फे देण्यात आली.

नागली पिकाचे सरासरी २८०८.६३ हेक्टर इतके क्षेत्र आहे. २४५१.१ हेक्टर क्षेत्रावर नागलीची लागवड करण्यात आली आहे. पाऊस व्यवस्थित असल्याने रोपांची वाढ, एकूण परिस्थिती समाधानकारक आहे. पिकावर किड व रोगाचा प्रादुर्भाव झालेला नाही.

काही तालुक्यांमध्ये तुर हे पीक बांधावर घेतले जाते. १०१९.६ हेक्टर क्षेत्रावर तुरीची लागवड करण्यात आली आहे. तृणधान्य व फळ पिके यांच्यासाठी पोषक वातावरण असून किड व रोगाचा प्रादुर्भाव झालेला नाही. ६९१.६५ हेक्टर क्षेत्रावर भाजीपाला लागवड करण्यात आली आहे. पीक वाढीच्या अवस्थेत असून काही ठिकाणी वेलवर्गीय पिकांची काढणी सुरू आहे.

> **भात पिकाची वाढ चांगली झाली आहे. नागली, तुर, तृणधान्य, फळे, भाजीपाला सर्व पिकांची परिस्थिती समाधानकारक आहे. किरकोळ प्रमाणात कीडरोगाचा प्रादुर्भाव झाला होतो. फवारणी करून तो नियंत्रणात आणला आहे. कोणत्याही पिकावर सध्या कीडरोगांचा प्रादुर्भाव नाही.**
> **-वंदना शिंदे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, रायगड**

# नवीन पनवेलच्या गार्डनमध्ये ओपन जिम आणि लहान मुलांसाठी खेळण्याचे साहित्य

### माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेल सेक्टर १९ येथील ग्रीनबेल्ट गार्डनमध्ये बसवण्यात आलेल्या ओपन जिम आणि लहान मुलांसाठी खेळण्याच्या साहित्याचे उद्घाटन पनवेल महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या हस्ते गुरुवारी (दि.२५) झाले. या वेळी त्यांनी नवीन पनवेल परिसरात येणाऱ्या काळात चांगल्या पद्धतीचा विकास होईल, असे प्रतिपादन केले तसेच भाजपचे शहर उपाध्यक्ष संदीप पाटील यांच्या पाठपुराव्यामुळे हे काम मार्गी लागल्याबद्दल कौतुक केले.

पनवेल मतदारसंघाचे क्रियाशील आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली आणि माजी सभागृह नेते परेश ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली पनवेल महापालिका क्षेत्रात अनेक विकासाची कामे मार्गी लागत आहेत. यालाच अनुसरून माजी नगराध्यक्ष तथा भाजपचे नवीन पनवेल मंडळ उपाध्यक्ष संदीप पाटील यांनी पनवेल महापालिकेकडे नवीन पनवेल सेक्टर १९ येथील ग्रीनबेल्ट गार्डनमध्ये ओपन जिम आणि लहान मुलांसाठी खेळणी बसवण्याबाबत पाठपुरावा केला होता. त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असून हे साहित्य महापालिकेच्या माध्यमातून गार्डनमध्ये बसवण्यात आले आहे.

उद्घाटन समारंभास भाजपचे जिल्हा सरचिटणीस प्रकाश बिनेदार, चारुशीला घरत, नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, उपाध्यक्ष संदीप पाटील, माजी नगरसेविका सुशीला घरत, वृषाली वाघमारे, हरचंदसिंग सग्गू, मयुर कदम आदी उपस्थित होते.

# बेकायदेशीर ॲप आधारित टॅक्सी, रिक्षा आणि वाहनांवर कारवाईचा बडगा

**मुंबई : रामप्रहर वृत्त**

राज्य शासनाने दिलेल्या आदेशानुसार ॲप आधारित वाहनचालकांनी नियमांचे पालन न केल्यास कठोर कारवाई करण्यात येणार आहे. यासाठी परिवहन विभाग आणि मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण यांनी विशेष मोहीम हाती घेतली असून, गेल्या काही दिवसांत २६३ अवैधरीत्या प्रवासी वाहतूक करणाऱ्या वाहनांवर तब्बल ३.८८ लाख इतका दंड ठोठावण्यात आला आहे, अशी माहिती परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.



मंत्री सरनाईक म्हणाले की, शासनाच्या निर्णयानुसार ॲप-बेस वाहने चालविण्यासाठी चालकांकडे वैध परवाना असणे तसेच चालकांना भाड्याच्या रकमेपैकी ८० टक्के भाडे देणे बंधनकारक असून, प्रवाशांकडून ठरविलेल्या दरापेक्षा कमी जास्त भाडे आकारता येणार नाही. नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर कारवाई मुंबईत अनेक ॲप-आधारित वाहने प्रवाशांकडून मनमानी भाडे वसूल करत असल्याच्या तक्रारींनंतर परिवहन विभागाने थेट कारवाईचा बडगा उगारला आहे.

विशेष म्हणजे, शासनाने ठरवून दिलेल्या दराप्रमाणेच प्रवाशांकडून भाडे आकारले पाहिजे. परंतु काही चालक विना परवाना तसेच अतिरिक्त शुल्क आकारत असल्याचे आढळून आले. अशा चालकांवर कारवाईसाठी मैदान पोलिस ठाणे, सांताक्रूझ पोलिस ठाणे आणि अंधेरी पोलिस ठाण्यात एफआयआर दाखल करण्यात आलेले आहेत. ऑटो-टॅक्सींसाठी प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाने ठरवलेल्या दरांनुसार--- ऑटो रिक्षासाठी (मीटरप्रमाणे) पहिल्या टप्प्यासाठी (१.५ किमी) २६ भाडे काळी-पिवळी टॅक्सी (मीटरप्रमाणे) पहिल्या १.५ किमी साठी ३१ भाडे यानंतर मीटरनुसार प्रवासाचे दर रुपये २०.६६ पैसे प्रति आकारले जातील. एसी वाहनांना १० % अधिक भाडे निश्चित केले आहे.'महाराष्ट्र बाईक-टॅक्सी नियम २०२५' अंतर्गत नवे आदेश या नियमानुसार राज्यात ई-बाईक आणि इलेक्ट्रिक दुचाकींद्वारे प्रवासी वाहतूक करण्यास परवानगी आहे.

दुचाकींसाठी पहिल्या १.५ किमी प्रवासाचे भाडे १५ तर नंतर प्रति किमी १०.२७ आकारण्यास मान्यता देण्यात आली आहे. ग्रिगेटर्स पॉलिसी लागू राज्यात ॲप-बेस वाहतूक व्यवस्थेवर नियंत्रण ठेवण्यासाठी शासनाने 'ग्रिगेटर्स पॉलिसी' लागू केली आहे. यानुसार परवान्याशिवाय ॲप-आधारित सेवा देणाऱ्या कंपन्यांवर व त्यांच्या चालकांवर कारवाई होणार आहे. मुंबईत बेकायदेशीर वाहनचालकांनी तातडीने नियमांचे पालन करावे, अन्यथा कठोर दंडात्मक कारवाई केली जाईल, असा स्पष्ट इशारा परिवहन विभागाचे सचिव तथा मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाचे प्रादेशिक परिवहन अधिकारी भरत कळस्कर यांनी दिला आहे. एकंदरीत, प्रवाशांची फसवणूक रोखण्यासाठी व सुरक्षित प्रवासासाठी शासनाने आखलेल्या धोरणांनुसार प-आधारित रिक्षा, टॅक्सी आणि इतर वाहनांवर नियंत्रणासाठी मोठ्या प्रमाणात पावले उचलण्यात आली असून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर पुढील काळात आणखी कठोर कारवाई होण्याची शक्यता आहे. असे प्रतिपादन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

# कळंबोली प्रभाग समितीतर्फे आरोग्य तपासणी शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात दिनांक १७ सप्टेंबर २०२५ ते २ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली 'स्वच्छता ही सेवा २०२५' अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत आज दिनांक २६ सप्टेंबर २०२५ रोजी पनवेल महानगरपालिकेच्या कळंबोली प्रभाग समिती अंतर्गत प्रभाग क्रमांक ७,८, ९, १०, १५ आणि १६ या ठिकाणी स्वच्छता कामगार व त्यांच्या कुटुंबियांना आरोग्य सुरक्षेचा लाभ मिळावा,या उद्देशाने प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या आरोग्य तपासणी शिबिरात स्वच्छता कामगार व त्यांच्या कुटुंबियांची नियमित आरोग्य तपासणी करून त्यांना आवश्यक त्या वैद्यकीय सल्ल्याची व औषधोपचारांची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. स्वच्छतेसाठी दररोज मेहनत घेणाऱ्या कर्मचाऱ्यांचे आरोग्य चांगले राहावे यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत आहे.




उपायुक्त डॉ.वैभव विधाते यांच्या सूचनेनुसार घेण्यात आलेल्या या शिबिरात सर्वसाधारण आरोग्य तपासणीसोबतच रक्तदाब, मधुमेह, रक्तातील साखरेची तपासणी, लसीकरण व आरोग्य विषयक मार्गदर्शन करण्यात आले. तज्ञ डॉक्टरांकडून व्यक्तिगत सल्ला व आवश्यक असल्यास पुढील उपचारांसाठी मार्गदर्शन देखील देण्यात आले. स्वच्छता कामगार व त्यांच्या कुटुंबीयांनी या आरोग्य तपासणी शिबिरात मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. आरोग्याच्या दृष्टीने अशा शिबिरांचे नियमित आयोजन होणे आवश्यक असल्याचे मत कर्मचाऱ्यांकडून व्यक्त करण्यात आले.महापालिकेचा हा उपक्रम स्वच्छता कामगार व त्यांच्या कुटुंबियांच्या आरोग्य सुरक्षेसाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल ठरले आहे. या शिबिरामुळे कर्मचाऱ्यांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता वाढली असून समाजातील एक महत्वाचा घटक असलेल्या स्वच्छता कर्मचाऱ्यांना थेट लाभ मिळाला .

# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल उलवे येथे सेवा हिरोज उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत**

रयत शिक्षण संस्थेच्या सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल उलवे येथे सेवा हिरोज ह्या नावाने एक उपक्रम राबवण्यात आला. त्यामध्ये विद्यार्थ्यांकडून स्कूलमध्ये कार्यरत असलेल्या सर्व सफाईच्या कर्मचारी सुरक्षारक्षक आणि सिडको प्रशासनाचे सफाई कर्मचारी वर्ग यांना एक छोटेखाने कार्यक्रमासाठी आमंत्रित करण्यात आले होते. ज्यामध्ये चलो जीते है या लघुपटाचे प्रदर्शन करण्यात आले.

त्यानंतर कर्मचारी वर्गाच्या निस्वार्थ सेवेला सन्मान देण्यासाठी प्रमाणपत्र व विद्यार्थ्यांनी तयार केलेले आभार पत्र तसेच भेटवस्तू देऊन त्यांना



सन्मानित केले. विद्यार्थ्यांनी आभार मनोगत व्यक्त करून सर्व कर्मचारी वर्ग बद्दल आदराची भावना असल्याचे दाखवून दिले. यानंतर स्कूलच्या मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर यांनी सर्वांच्या आभार मानले

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयात फॅकल्टी एक्सचेंज प्रोग्राम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात बुधवार दिनांक २४ सप्टेंबर सकाळी ११.०० वाजता कॉमर्स व अकाउंटन्सी विभागातर्फे फॅकल्टी एक्स्चेज प्रोग्रामचे आयोजन केले होते.

या फॅकल्टी एक्सचेंज प्रोग्रामसाठी राजीव गांधी महाविद्यालयातील प्रा. श्वेता शेट्टी यांनी महाविद्यालयातील कॉमर्स



व अकाउंटन्सी विभागातील द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना अर्थशास्त्र या विषयातील बारकावे, वेगवेगळ्या संकल्पना या विषयी मार्गदर्शन केले या व्याख्यानाचा लाभ विद्यार्थी व विद्यार्थिनीनी घेतला वत्यांच्या शंकांचे निरसन केले.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांच्या मार्गदर्शनात हा शैक्षणिक उपक्रम यशस्वीरित्या घेण्यात आला. या फॅकल्टी एक्सचेंज प्रोग्रामचे आयोजन प्रा. राहुल कांबळे यांनी केले तसेच प्रा. विशाल देशमुख विभाग प्रमुख कॉमर्स व अकाउंटन्सी, प्रा. डॉ. महादेव चव्हाण, प्रा. तनुजा सुमन, प्रा. प्रमोद वाघे व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

# अमरधाम स्मशानभूमीच्या दूरवस्थेसंदर्भात निवेदन

**पनवेल :** शहरातील अमरधाम स्मशानभूमीच्या दूरवस्थेबाबत शिवसेनेच्या वतीने आयुक्त मंगेश चितळे यांना निवेदन देण्यात आले असून याबाबत ठोस कारवाई न झाल्यास शिवसेना पध्दतीने आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही शिवसेना स्थानिक नेते चंद्रशेखर सोमण यांनी दिला आहे.

शिवसेनेच्या वतीने यापुर्वी याबाबत आयुक्त मंगेश चितळे यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करून सविस्तर निवेदन दिले होते. विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन यावेळी आयुक्तांनी स्वतः लक्ष घालण्याचे ठोस आश्वासन दिले होते. परंतू याबाबत महापालिकेच्या वतीने कोणतीही ठोस कारवाई न झाल्याने पुन्हा याबाबत तातडीने कारवाई करावी अन्यथा शिवसेना पध्दतीने आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही देण्यात आला आहे.

# स्वस्थ नारी-सशक्त परिवार अभियान अंतर्गत नेरळ येथे आरोग्य शिबिर

**नेरळ : प्रतिनिधी**

नागरिकांच्या आरोग्याची जाणीव ठेवून शासन विविध उपक्रम राबवत आहे. महिलांच्या नियमित तपासण्या आणि नेत्र तपासणीसारख्या सेवांचा अधिकाधिक लाभ घेणे हेच समाजाच्या प्रगतीसाठी आवश्यक आहे, असे शिबिरानंतर प्रतिक्रिया देताना डॉ. नितीन गुरव यांनी सांगितले.भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त सुरू असलेल्या सेवा पंधरवडा उपक्रमाचा एक भाग म्हणून महाराष्ट्र शासनाच्या वतीने आणि आरोग्य विभागाच्या पुढाकाराने नमो नेत्र संजीवनी व स्वस्थ नारी - सशक्त परिवार अभियानांतर्गत राज्यभरात मोठ्या प्रमाणावर आरोग्य शिबिरे आयोजित केली जात आहेत.



याच उपक्रमाचा भाग म्हणून नेरळ प्राथमिक आरोग्य केंद्र यांच्या माध्यमातून नेरळ येथील धारप सभागृहामध्ये आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरामध्ये महिलांच्या विविध तपासण्या, नेत्र तपासणी, आयुष्यमान भारत कार्ड नोंदणी, आधार कार्ड अद्ययावत करणे तसेच रेशनकार्डातील दुरुस्त्या आदी सेवा नागरिकांना उपलब्ध करून देण्यात आल्या.या शिबिराचा ५०० हून अधिक नागरिकांनी लाभ घेतला. शासनाच्या वतीने आयोजित या शिबिरामध्ये भारतीय जनता पार्टी नेरळ मंडळाने सहकार्य केले.

शिबिराला जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे यांसह नितीन कांदळगावकर, मंगेश म्हसकर, राजेश भगत, नरेश मसणे, वैभव भगत, नरेंद्र कराळे, नम्रता कांदळगावकर, श्रद्धा कराळे, सुप्रिया भगत, साधना जाधव, मृणालिनी शेळके, निशा भोईर आदींनी विशेष परिश्रम घेतले.

शासनाकडून डॉक्टर नितीन गुरव, नेरळ पीएससीचे सुभाष चव्हाण, सर्व आशा वर्कर तसेच तहसीलदार धनंजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखालील महसूल व पुरवठा विभागातील अधिकारी व कर्मचारी यांनीही हे शिबिर यशस्वी होण्यासाठी विशेष मेहनत घेतली.

यावेळी जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी सांगितले की, शासनाच्या क्षयरोग विरोधी मोहिमेत भाजप कार्यकर्ते निक्षय स्वयंसेवक सक्रिय योगदान देतील. सेवाकार्याच्या माध्यमातून योजना अधिकाधिक जनतेपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न करतील.

# 'मुंबई महापालिकेच्या निकषाप्रमाणे कोळी बांधवांना नुकसानभरपाई द्या'

**मुंबई, : रामप्रहर वृत्त**

कोस्टल रोड आणि सागरी सेतूमुळे नुकसान होणाऱ्या कोळी बांधवांना नुकसान भरपाई देताना मुंबई महापालिकेच्या निकषाप्रमाणे देण्यात यावी, असे निर्देश मुंबई उपनगर पालकमंत्री ॲड् आशिष शेलार यांनी आज येथे दिले. वांद्रे वर्सोवा सागरी सेतूमुळे खार दांडा कोळीवाडा परिसरातील कोळी बांधवांचे मासेमारीचे नुकसान होणार आहे. त्यामुळे त्यांना शासनातर्फे नुकसान भरपाई देण्यात येणार आहे, मात्र मुंबई महापालिकेचे निकष आणि शासनाचे निकष यामध्ये तफावत आहे. कोस्टल रोडचा जो टप्पा मुंबई महापालिकेने बांधला त्यासाठी मुंबई महापालिकेने जे निकष तयार केले तेच निकष पुढे शासनाने ग्राह्य धरून खारदांडापासून वर्सोवा ते भाईंदरपर्यंत जिथपर्यंत कोस्टल रोड जातो तिथपर्यंत या निकषाप्रमाणेच नुकसान भरपाई देण्यात यावी असे निर्देश मंत्री आशिष शेलार यांनी दिले.

शासनाच्या निकषांप्रमाणे कमी नुकसान भरपाई मिळते तर वरळी सागर सेतूमुळे बाधित झालेल्या कोळी बांधवांना मुंबई महापालिकेच्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई मिळाली. यामुळे कोळी बांधवांनी याबाबत आक्षेप घेऊन उपनगर पालकमंत्री आशिष शेलार यांच्याकडे तक्रार केली होती याबाबत आज मुंबई मेरीटाईम बोर्ड, एम.एस.आर. डी.सी, एम.एम.आर.डी.ए मुंबई महापालिका यांची संयुक्त बैठक घेउनमहापालिकेच्या निकषांचा समावेश करुन शासनाच्या अध्यादेशामध्ये सुधारणा करा, असे निर्देश दिले.



पान १ वरुन

## कर्मवीरांच्या विचारांची पिढी घडवूया -लोकनेते रामशेठ ठाकूर

कार्यक्रमास स्थानिक शाळा समितीचे ज्येष्ठ सदस्य अनंताशेठ ठाकूर, विश्वनाथ कोळी, गव्हाण ग्रामपंचायतीचे माजी उपसरपंच विजय घरत, भाऊशेठ पाटील, वसंतशेठ पाटील, रामदास ठाकूर, जितेंद्र म्हात्रे, न्हावे ग्रामपंचायतीचे सरपंच विजेंद्र पाटील, सागर ठाकूर, सी.एल. ठाकूर, सुधीर ठाकूर, राजेंद्र देशमुख, रघुनाथ देशमुख, भाऊ भोईर, काशिनाथ पाटील, हेमंत ठाकूर, भार्गव ठाकूर, कुंदन मोकल, ॲड.योगिता भगत, मीनाक्षी पाटील, माजी प्राचार्य साधना डोईफोडे, वैभव घरत, अंकुश ठाकूर, पी.के. ठाकूर, राम मोकल, संस्थेचे रायगड विभागीय अधिकारी मोहन कोंगेरे, लाईफ मेंबर प्रमोद कोळी, रवींद्र भोईर, लाईफ वर्कर देवेंद्र म्हात्रे, एमएनएम विद्यालयाच्या प्राचार्य सायली वडवलकर, प्रणिता गोळे, कांबळे गुरुजी, प्राचार्य तथा संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्य ज्योत्स्ना ठाकूर, उपमुख्याध्यापक विलासराव लेंभे, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, ज्युनिअर कॉलेजचे विभाग प्रमुख संजय उगले यांच्यासह विद्यार्थी, शिक्षक आणि पंचक्रोशीतील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कर्मवीर जयंती वक्तृत्व स्पर्धेतील विजेत्या विद्यार्थ्यांच्या जोशपूर्ण भाषणाने विद्यार्थी प्रेक्षकांसह मान्यवरांचीही वाहवा मिळवली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व अहवाल वाचन ज्योत्स्ना ठाकूर यांनी, सूत्रसंचालन ज्येष्ठ शिक्षक सागर रंधवे व दर्शना माळी यांनी केले, तर उपस्थितांचे आभार चेअरमन अरुणशेठ भगत यांनी मानले.

# अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी अलिबाग तालुक्यातील विविध ठिकाणांची केली पाहणी

**रायगड : रामप्रहर वृत्त**

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण जडणघडणीसाठी जिल्हा परिषद प्राथमिक शाळा महत्त्वाची भूमिका बजावतात. शिक्षणासोबतच मुलांच्या संस्कार आणि मूल्यवर्धनासाठी जिल्हा परिषद शाळांमध्ये विविध उपक्रम राबवले जातात. या उपक्रमांना चालना देण्यासाठी जिल्ह्यातील सर्व विभागातील कार्यरत अधिकारी वर्षातून किमान दोनदा शाळांना भेट देऊन प्रेरणा दिवस साजरा करणार आहेत.



या पार्श्वभूमीवर राज्याचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनी जिल्हाधिकारी किशन जावळे यांच्यासोबत आज अलिबाग तालुक्यातील पी. एम. श्री. रा. जि. प. शाळा, नवगाव येथे पालक, शिक्षक व विद्यार्थी यांच्याशी सुसंवाद साधून शैक्षणिक व सामाजिक प्रगतीसाठी मार्गदर्शन केले. बोरिस व गुंजीस येथील पाणंद रस्त्यांची पाहणी केली.

ग्रामपंचायत गुंजीस येथे नवगाव आरोग्य केंद्र, जिल्हा परिषद शाळा तसेच तहसील कार्यालय, अलिबाग कार्यालयाची पाहणी केली. यावेळी जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख सुनील इंदलकर, उपविभागीय अधिकारी मुकेश चव्हाण, तहसीलदार विक्रम पाटील उपस्थित होते.

# खारघर परिसरात नवीन रस्त्याची मागणी

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

खारघर परिसरामध्ये दिवसेंदिवस वाढणाऱ्या वाहनसंख्येमुळे प्रवेशमार्गावर मोठ्या प्रमाणावर वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. सध्या हिरानंदानी फ्लायओव्हर व कोपरा फ्लायओव्हर हे दोनच प्रमुख मार्ग उपलब्ध असल्यामुळे या मार्गावर सतत मोठ्या प्रमाणावर वाहने ये-जा करत असून, नेहमीच वाहतूक कोंडीचे चित्र दिसून येते. यावर तोडगा म्हणून स्थानिक नागरिकांनी सायन-पनवेल महामार्गावरील मेडीसिटी रुग्णालयासमोरून नवीन रस्ता उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. हा रस्ता तयार झाल्यास खारघरमध्ये प्रवेशासाठी तीन प्रमुख मार्ग उपलब्ध होतील. त्यामुळे वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणावर कमी होऊन खारघरकरांना दिलासा मिळेल. ही मागणी गांभीर्याने विचारात घेऊन संबंधित प्रशासनाने तातडीने नवा रस्ता उपलब्ध करून द्यावा, अशी विनंती भारतीय जनता पार्टी रायगड उत्तर जिल्हा सचिव ब्रिजेश पटेल यांनी केली आहे.

# विशेष सवलत मिळविण्याचे शेवटचे तीन दिवस; नागरिकांनी लाभ घेण्याचे आवाहन

## ३० सप्टेंबरपर्यंत शास्तीवर ९० टक्के सूट



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागामार्फत करदात्यांना दिलासा देण्यासाठी 'अभय योजना' राबविण्यात येत आहे. नागरिकांच्या वाढत्या मागणीनुसार आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या सूचनेनुसार या योजनेत शास्तीमध्ये अंतिम मुदतवाढ देण्यात आलेली आहे . दिनांक ३० सप्टेंबर पर्यंत शास्तीवरती ९० टक्के सुट राहणार आहे. ही विशेष सवलत मिळण्याचे शेवटचे तीन दिवस शिल्लक राहिले असून नागरिकांनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन महापालिकेच्यावतीने आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी केले आहे.

नागरिकांच्या वाढत्या मागणीनुसार अभय योजनेंतर्गत शास्तीवरील ९० टक्क्याची सूट दिनांक ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत वाढविण्यात आली आहे. ही अंतिम मुदतवाढ असून या योजनेचा नागरिकांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा असे अवाहन उपायुक्त स्वरूप खारगे यांनी केले आहे. महापालिकेकडून नागरिकांना विविध सवलतींचा लाभ घेण्यासाठी डिजिटल व्यवहाराला प्रोत्साहन देण्यात आले आहे. करदात्यांनी ईबिल स्वीकारणे, डिजिटल पद्धतीने कर भरणे यामुळे थेट २% सवलत मिळू शकते. तसेच ऊर्जा बचत करणारे सौर पॅनल, वॉटर हार्वेस्टिंग अशा उपाययोजना केल्यास करामध्ये २% सवलत दिली जाणार आहे. याशिवाय घनकचऱ्याची शास्त्रीय पध्दतीने विल्हेवाट करणाऱ्या सोसायट्यांना नियमानुसार २ टक्के करात सवलती मिळणार आहे.

कर भरण्याची प्रक्रिया सुलभ करण्यासाठी महापालिकेचे panvelmc.org हे संकेतस्थळ तसेच PMC TaxApp आणि Panvel ConnectApp उपलब्ध करून देण्यात आले आहे. यामुळे करदात्यांना घरबसल्या ऑनलाईन कर भरण्याची सुविधा मिळत आहे. अभय योजनेंतर्गत शास्ती माफीमधील ही अंतिम मुदतवाढ लक्षात घेऊन नागरिकांनी थकबाकी त्वरित भरून, दिलेल्या शास्ती माफी व सवलतींचा लाभ घ्यावा.

### कर-मित्र चॅटबॉटची सुविधा

*नागरिकांना अधिक सोयीस्कर, वेगवान आणि पारदर्शक सेवा देण्यासाठी पनवेल महानगरपालिकेने 'कर-मित्र' चॅटबॉटची सुविधा सुरू करण्यात आली आहे. हा अत्याधुनिक चॅटबॉट मालमत्ता करदात्यांना घरबसल्या त्वरित माहिती, मार्गदर्शन आणि ऑनलाइन मदत पुरवेल.*

# शेतीच्या वादावरून बापाला लोखंडी सळईने केली मारहाण

**पनवेल : वार्ताहर**

बापाला लोखंडी सळईने मारहाण करून गंभीर जखमी केल्याप्रकरणी मुलगा बाळाराम गणा चौधरी, नातू प्रेम चौधरी, आणि रेणुका चौधरी (चिखले) यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.गणा चौधरी हे चिखले येथे राहत असून ते गावात देव दर्शनाला गेले होते. गावदेवी मंदिर चिखले येथे आले असता मुलगा व नातू यांनी त्यांचा हात पकडला आणि लोखंडी सळई घेऊन दोन्ही पायावर मारहाण केली. यात ते जखमी झाले. त्यानंतर पाठीवर आणि हातावर सळईने आणि लाथाबुक्यांनी मारहाण करून जखमी केले.

यावेळी रेणुका यांनी शिवीगाळ केली. शेती माझ्या नावावर कर नाहीतर सोडणार नाही असे बाळाराम यावेळी बोलत होता.

## जुन्या किरकोळ वादातून तरुणाला मारहाण

**पनवेल :** एका किरकोळ वादातून तरुणाला बेदम मारहाण केल्याची घटना सेक्टर ८ येथे घडली आहे. तानाजी सुपेकर हा कामोठे सेक्टर ८ येथे राहत असून तो नीरज हेअर सलून या दुकानात दाढी कटिंग साठी आला असता जुन्या किरकोळ वादातून नवनाथ ढाकणे याने मीरा ढाकणे, ओमकार ढाकणे आणि एक अनोळखी इसमाच्या सहाय्याने तानाजी सुपेकर याला लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## पोलीस असल्याची बतावणी करून लुटले

**पनवेल : वार्ताहर**

पोलीस असल्याचे बतावणी करून एका ६८ वर्षीय रिटायर्ड रेल्वे विभागातील कर्मचाऱ्याला लुटल्याची घटना नवीन पनवेल येथे घडली. या प्रकरणी अनोळखी इसमा विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.भारत लक्ष्मण जाधव हे सेक्टर १२ खांदा कॉलनी येथे राहत असून ते सेक्टर ४ नवीन पनवेल येथे पायी चालत जात असताना या ठिकाणी त्यांना एका इसमाने थांबवले. त्याची चौकशी केली आणि सोन्याचे दागिने बॅग मध्ये ठेवण्यास सांगितले.

बॅग मध्ये ठेवत असताना पोलीस असलेल्या इसमाने ते दागिने काढून घेऊन तपासण्याचे नाटक केले आणि पिशवीत दागिने टाकल्याचे नाटक केले.



**पनवेल : महापालिकेच्या अतिरिक्त आयुक्तपदी महेशकुमार मेधमाले हे नियुक्त झाले आहे. याबद्दल त्यांनी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची शुक्रवारी भेट घेऊन महापालिकेच्या विविध विषयांवर चर्चा केली.**

# कामोठ्यातील लोकनेते दि.बा.पाटील विद्यालयात कर्मवीर जयंती सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आशिया खंडातील सर्वात मोठी संस्था म्हणून ओळखले जाणाऱ्या रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक यांचा जन्म २२ सप्टेंबर हा दिवस कर्मवीर जयंती म्हणून सर्व महाराष्ट्रात साजरा केला जातो. संस्थेच्या विविध शाखांमध्ये विविध स्पर्धा, कार्यक्रम घेऊन कर्मवीर सप्ताह साजरा केला जातो. याचाच एक भाग म्हणून शिक्षण संस्थेचे संस्थापक आदरणीय डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १३८वी जयंती सोहळा कार्यक्रम लोकनेते दि.बा.पाटील विद्यालयात विद्यालयात संपन्न झाला.



या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. अरुणकुमार भगत, शंकर म्हात्रे, रयत संस्थेच्या रायगड विभागाचे सहाय्यक विभागीय अधिकारी जगताप व्ही.यू. स्थानिक स्कूल सल्लागार समितीचे चेअरमन जयदास गोवारी, व्हाईस चेअरमन विनायक म्हात्रे, माजी चेअरमन शिक्षणप्रेमी स्वामी अप्पा म्हात्रे, स्थानिक स्कूल कमिटी सदस्य प्रवीण गोवारी, दशरथ म्हात्रे आदी मान्यवर उपस्थित होते.

मुख्याध्यापक तथा रयत संस्थेच्या रायगड विभागाचे विभागीय अधिकारी कोंगेरे एम.के. यांनी आतापर्यंत शाळेचा इतिहास, शाळेची शैक्षणिक प्रगती याविषयी माहिती दिली. प्रमुख वक्ते रयत शिक्षण संस्थेचे माजी विद्यार्थी कमवा शिका योजनेतून आपले शिक्षण पूर्ण करणारे नागू विरकर यांनी आपल्या भाषणातून कर्मवीर भाऊराव पाटील यांचे बालपण, शैक्षणिक योगदान ,रयत शिक्षण संस्थेची वाटचाल याबद्दल माहिती सांगितली. विद्यार्थी भाषणातून धनश्री जानकर,स्वरांजली खरात, श्रद्धा पाटील यांनी कर्मवीरांविषयी आपले विचार मांडले. शिक्षक मनोगतातून गणेश लांडे यांनी अण्णांच्या कार्याची माहिती दिली.

विद्यालयातील वक्तृत्व निबंध, प्रश्नमंजुषा, क्रीडा या स्पर्धांतील प्रथम आलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. तसेच माधवबाग संस्थेतर्फे जिल्हा आदर्श शिक्षक प्राप्त अनिल पाटील यांचा सत्कारे करण्यात आला. विद्यालयाचे चेअरमन जयदास गोवारी यांनी शाळेची भौतिक प्रगती आणि शैक्षणिक प्रगतीची वाटचाल कशी असेल याबद्दल माहिती दिली. माजी चेअरमन शिक्षणप्रेमी स्वामी म्हात्रे यांनी मनोगतातून कर्मवीर भाऊराव पाटील यांना अभिवादन केले.

अध्यक्ष भाषणामध्ये डॉ. अरुणकुमार भगत यांनी कर्मवीर अण्णा आणि रयत शिक्षण संस्थेचे महत्त्व कामोठे परिसराला कसे झाले हे आपल्या मनोगतातून सांगितले. या जयंती सोहळ्याच्या कार्यक्रमाप्रसंगी विद्यालयाच्या विद्यार्थिनींनी लेझीम पथक व स्वागतगीतातून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

# पनवेलमध्ये हॅव्हेल्स होम आर्ट्स लाईट्सचे उद्घाटन



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमध्ये हॅव्हेल्स होम आर्ट्स लाईट्स दुकानाचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते उद्घाटन झाले.पनवेल शहरात आकर्षक आणि आधुनिक लाईटिंग डिझाईन्सचे नवीन दुकान सुरू झाले आहे. हॅव्हेल्स होम आर्ट्स लाईट्स या दुकानाचे उदघाटन आमदार प्रशांत ठाकूर यांच्या हस्ते शुक्रवारी करण्यात आले.

पनवेलमधील प्रशांत कॉर्नरजवळ असलेल्या या नवीन दुकानाची अशोक बाफना यांनी सुरुवात केली आहे. या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी बाफना यांचे अभिनंदन करत त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी भाजपचे पनवेल शहर अध्यक्ष सुमित झुंजारराव, प्रभाग अध्यक्ष पवन सोनी, तनिषा बाफना, हर्षित बाफना, शर्मिला बाफना, कार्तिक बाफना यांच्या सह मान्यवर उपस्थित होते.

या नव्या दुकानामध्ये घराच्या सजावटीसाठी उपयुक्त अशा पारंपरिक तसेच आधुनिक शैलीतील विविध प्रकारच्या लाईटिंग डिझाईन्स उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. त्यामुळे पनवेलकरांसाठी हे नवे लाईट्स व डेकोर दुकान आकर्षणाचे ठिकाण ठरेल.

## सख्ख्या भावाच्या डोक्यात दगड घालून केला खून

**पनवेल :** सख्ख्या भावाने भावाच्या डोक्यात दगड घालून खुन करणाऱ्या आरोपीला पनवेल शहर पोलिसांच्या बीट मार्शलने प्रसंगावधान दाखवत पळून जाण्याच्या बेतात असताना त्याला अटक केली.

करंजाडे से. ५ पोलीस चौकी समोर जाणाऱ्या रोडला एक ४७ वर्षाच्या पुरुषाचा दगडाने ठेचुन खुन झाल्याची माहिती फोनद्वारे पोलीस हवालदार माधव शेवाळे यांना बातमीदाराने दिली. त्यानंतर लगेच त्यांनी बातमी वरिष्ठांना दिली. बिट मार्शल पोहवा विलास कारंडे व पोहवा राजेंद्र केणी यांनी घटनास्थळी उपस्थित व्यक्तींकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे प्रसंगावधान दाखवत आरोपी नागेश काळे (वय ३२) हा पळून जाण्याच्या बेतात असताना ताब्यात घेतले.

मयताचे त्याच्या चुलत भावाचे पत्नी सोबत अनैतिक संबंध असल्याचे कारणावरुन आरोपी नागेश वाल्या काळे याने त्याचा मयत भाऊ दत्तु वाल्या काळे, वय ४५ वर्षे याचे डोक्यात दगड घालुन त्याची हत्या केली. आरोपी नागेश काळे याचे विरुद्ध पनवेल शहर पोलीस ठाणेत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# श्री क्षेत्र नंदेश्वर येथे बाळकृष्ण माऊलींचा पुण्यतिथी सप्ताह

**मंगळवेढा : रामप्रहर वृत्त**

नंदेश्वर (ता. मंगळवेढा) येथे श्री बाळकृष्ण माऊली अध्यात्म ज्ञान मंदिरात श्री बाळकृष्ण माऊलींच्या पुण्यतिथी सप्ताह सोहळ्यानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती श्री बाळकृष्ण माऊली भक्त मंडळ व देवसागर साधक समाज यांचे वतीने देण्यात आली आहे.

दि. शनिवार २७ सप्टेंबर ते बुधवार दि. १ ऑक्टोबर या पाच दिवसांच्या काळात पुण्यतिथी सप्ताह सोहळा संपन्न होणार आहे. शनिवार दि. २७ रोजी पहाटे पाच ते सहा या वेळेत प्रभात फेरी होऊन पुण्यतिथी सप्ताह सोहळ्यास प्रारंभ होणार आहे. श्री स स बाळासाहेब महाराज यांचे हस्ते विनापूजन तसेच ग्रंथराज श्री दासबोध व श्री बाळकृष्ण चरित्रामृत ग्रंथाचे पुजन होईल. सोमवार दि. २९ रोजी पहाटे पाच वाजता नंदेश्वर येथील भाविक भक्त श्रीक्षेत्र इंचगिरी येथे नामज्योत आणण्यासाठी रवाना होतील.

इंचगिरी येथे नामज्योत आणण्यासाठी गेलेले भाविक मंगळवारी दुपारी ठीक चार वाजता श्रीक्षेत्र नंदेश्वर येथे येथील व यानंतर श्री बाळकृष्ण माऊलींच्या पालखीची भव्य अशी मिरवणूक निघेल. बुधवार दि. १ नोव्हेंबर रोजी सकाळी ठीक नऊ वाजता संगीत भजनात प्रारंभ होईल. यानंतर सकाळी ठीक अकरा वाजता श्री स स बाळासाहेब महाराज यांच्या सुश्राव्य अशा प्रवचनास सुरुवात होईल. यानंतर दुपारी ठीक बारा वाजता पुष्पवृष्टी होऊन महाप्रसादानंतर या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता करण्यात येईल.

सप्ताह काळात पहाटे चार ते पाच या वेळेत काकड आरती, पाच ते सहा वाजता प्रभात फेरी, सकाळी सात ते आठ श्रींची महापुजा, आठ ते नऊ वा. श्री भागवत वाचन व ध्यान, सकाळी नऊ ते दहा वाजता संगीत भजन, दहा ते बारा वाजता प्रवचन व दुपारची आरती, दुपारी तीन ते सहा वाजता प्रवचने, परमार्थिक व्याख्याने व भजन, सायंकाळी सहा वाजता सायंकाळची आरती, रात्री सात ते आठ वा. श्री भागवत वाचन व ध्यान, रात्री आठ ते दहा वाजता संगीत भजन, रात्री दहा ते बारा वाजता कीर्तन, प्रवचन व बारा अभंग असे धार्मिक कार्यक्रम होतील. या कार्यक्रमासाठी पनवेल तालुक्यातून शिवाजीनगर गव्हाण येथील श्री बाळकृष्ण माऊलीअध्यात्मिक मंदिरातून नव्हा ,नव्हेखडी, कोपर,बामणडोंगरी, वहाळ, मोरावे,तसेच हनुमान कोळीवाडा उरण. इत्यादी ठिकाणहून अनेक भक्तमंडळी उपस्थित राहतात.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे माता पिता स्वानंद सुख निवासी मातोश्री भागुबाई व पिताजी चांगू काना ठाकूर यांचे प्रेरणेने व लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली याभागातीलअनेक भक्तमंडळी याकार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित राहतात. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी श्री क्षेत्र नंदेश्वरच्या विकासासाठी रुपये २१ लाखाची भरीव देणगी दिली आहे.

## भाजपतर्फे करंजाडेमध्ये सेवा पंधरवड्यानिमित्त विविध कार्यक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आपल्या देशाचे खंबीर नेतृत्व, पंतप्रधान नरेन्द्र जी मोदी यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त दि. १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर असा सेवा पंधरवडा साजरा करण्यात येत आहे. या अंतर्गत राष्ट्रीय अध्यक्ष जे.पी. नड्डा यांच्या निर्देशानुसार करंजाडे मध्ये खालील उपक्रम राबवण्यात येणार आहेत

१. पंडित दीनदयाळ उपाध्याय जयंती दि. २५ सप्टेंबर, संध्याकाळी. ठिकाण : भाजपा कार्यालय २. एक पेड मां के नाम : रविवार (दि.२८)रोजी, कोठारी शाळेच्या मैदानजवळ (आपल्या मुलांकडून त्यांच्या मातांनी वृक्षारोपण करून घेणे) वृक्ष व इतर व्यवस्था केली आहे ३. मन की बात :
मा. पंतप्रधान यांचा जनतेशी संवाद.
रविवार २८ सप्टेंबर, सकाळी ११-११.३०
ठिकाण: भाजप मध्यवर्ती कार्यालय, सेक्टर ४, करंजाडे. ४.समाजातील महिला रिक्षाचालक, उद्योजक व समाजसेविका यांचा सत्कार:
करंजाडे शहरातील महिला उद्योजक व इतर सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या महिलांचा सत्कार केला जाईल. दि. २६-२८-२९ सप्टेंबर, रात्री ९ वा. स्थळ: सेक्टर ४, नवरात्र उत्सव स्टेज.

यामध्ये सर्व नागरिक व भाजपा कार्यकर्ते, पदाधिकारी यांनी सहभागी व्हावे.असे आवाहन करंजाडे सरपंच, मंगेश शेलार व भाजपा शहर अध्यक्ष संदेश पाटील यांनी केले आहे

## रिफ्लेक्शन थिएटर यंदाही करणार हौशी नाट्य स्पर्धेत पनवेलचे प्रतिनिधित्व

**पनवेल : रामप्रहर वृत्त**


दरवर्षीप्रमाणे यंदाही महाराष्ट्र लोक कल्याणकारी सेवा संस्थेची रिफ्लेक्शन थिएटर नाट्यसंस्था पनवेल तालुक्यातून महाराष्ट्र राज्य शासन आयोजित हौशी नाट्य स्पर्धा २०२५ मध्य एकमेव प्रतिनिधी म्हणूने सहभागी होत आहे. या स्पर्धेसाठी संस्थेची निवड झाली असून सरावाला पनवेलमध्ये उत्साहात सुरुवात झाली आहे.

या नाटकाचे लेखन व दिग्दर्शन संकेत गायकवाड करत आहेत. संस्थेचे अध्यक्ष व नाट्य व्यवस्थापक म्हणून मृण्मय काणे कार्यरत आहेत, तर प्रसिद्धी प्रमुख, सोशल मीडिया हेड तसेच फिल्म कॉर्डिनेटर म्हणून प्रसाद हनुमंते जबाबदारी पार पाडत आहेत. नाटकाचा पहिला प्रयोग येत्या नोव्हेंबर महिन्यात ठाणे येथील काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात रंगणार आहे.





श्री दुर्गामाता मित्र मंडळ,
दिघाटी, ता. पनवेल



श्री गणेश मित्र मंडळ,
खालची आळी, शिरढोण पाडा



गावदेवी दुर्गामाता मित्र मंडळ,
दिघाटी, ता. पनवेल

## संपादकीय

# बळीराजाला हात द्या

महाराष्ट्रावर अस्मानी संकट कोसळलेले असताना घरात बसून राहणे स्वत:ला नेते म्हणवणाऱ्यांना शोभादायक नाही तसेच अशा संकटकाळी राजकारण करू नये एवढे साधे भानदेखील विरोधकांना उरलेले नाही. शेतकरी सर्वांचा पोशिंदा आहे. त्याला किमान धीर देण्याची सकारात्मक भूमिका सगळ्यांनी घेणे गरजेचे आहे.

**कृषीप्रधान भारताला मान्सूनचा आशीर्वाद आहे. पर्जन्यराजाच्या कृपादृष्टीमुळेच गेली असंख्य शतके आपल्या देशात कृषीसंस्कृती फळली आणि फुलली. आज १४६ कोटी लेकरांची पोटे भरणारी भारताची सुपीक भूमी एरव्ही अन्नधान्याचे हिरेमोती पिकवत असली तरी वरुणराजाची वक्रदृष्टी मात्र तिला हतबल करून टाकते. महाराष्ट्रातील शेतकरी आज अतिवृष्टी व पूरस्थितीने पार पिचून गेला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस क्षणाचाही विलंब न लावता लगेच थेट बांधावर उतरले. शेतकऱ्यांच्या नुकसानीची पाहणी करून त्यांनी शेतकऱ्यांना धीर दिला. दोन्ही उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे हेही सध्या आडव्या झोपलेल्या शेतशिवारांतून फिरत आहेत. इतकेच नव्हे तर महायुती सरकारचे सगळेच मंत्रिमंडळ शेतकऱ्यांच्या मदतीसाठी धावून गेलेले दिसते. दुर्दैवाने विरोधीपक्षांचे नेते मात्र आरामात आपल्या घरात बसून महायुती सरकारवर टीका करण्यात धन्यता मानत आहेत. नाही म्हणायला विरोधीपक्षांचे काही नेते देखाव्यापुरते कुठल्याशा गावात जाऊन आले. आभाळ फाटलेले असताना शेतकऱ्याच्या सोबतीला उभे राहणे हेच नेतृत्वाचे लक्षण असते. राज्यातील सुमारे ४७ टक्के खरीप हंगाम अतिवृष्टीमुळे वाया गेला आहे. सरकारी आकडेवारीनुसार २६ लाखांपेक्षा अधिक हेक्टरवरील पिकांचे नुकसान झालेले प्रथमदर्शनी दिसते आहे. हा प्राथमिक आकडा असून यात झालीच तर थोडीफार वाढच होईल. एकूण ३० जिल्हे अतिपावसाने बाधित झाले आहेत. सध्याच्या नुकसानीसंदर्भात काही तांत्रिक अडचणी देखील असून मदतनिधीवरूनही शेतकऱ्यांमध्ये संभ्रम पसरवण्यात येत आहेत. आणखीन एक तांत्रिक बाब म्हणजे सरकारदरबारी कागदोपत्री ओला दुष्काळ ही संकल्पनाच नाही. त्याऐवजी सततचा पाऊस अशी सरकारी संज्ञा वापरण्यात येते. अशा सर्व अडचणींमुळे नुकसानभरपाई मिळण्याचे निकषही कठीण होऊन बसले आहेत. तरीही दिवाळीपूर्वी नुकसानभरपाई देणार हे मान्य करण्यात आले आहे. कितीही अडचणी आल्या तरी शेतकऱ्यांना मदत करणारच या जिद्दीने फडणवीस सरकारने आव्हान स्वीकारले आहे. राज्य सरकारने आतापर्यंत ३१ लाख शेतकऱ्यांना २ हजार २१५ कोटी रुपयांची आर्थिक मदत मंजूर केली आहे. मुख्यमंत्री फडणवीस हे सध्या दिल्ली दौऱ्यावर असून त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना राज्यातील पूरस्थितीची कल्पना दिली. लवकर प्रस्ताव येऊ द्या असे म्हणत शक्य तेवढ्या जास्त मदतीचे आश्वासन पंतप्रधानांनी दिले आहे. महायुतीचे सरकार सक्षम असून केंद्रातील मोदी सरकार खंबीरपणे महायुती सरकारच्या मागे उभे आहे. त्यामुळेच केंद्र आणि राज्य सरकार मिळून सर्वस्व हरवलेल्या शेतकरी बांधवांना या संकटातून बाहेर काढतील असा विश्वास वाटतो. संकटकाळी विरोधकांनी राजकारण करू नये असे आवाहन फडणवीस यांनी केले असले तरी त्याचा काहीही उपयोग होणार नाही. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी शेतकरी बांधवांना अन्नधान्याची मदत केली. विरोधकांना मात्र अन्नधान्याच्या पाकिटांवरचा शिंदे यांचा फोटो दिसला. आतमध्ये काय आहे याकडे मात्र त्यांनी सपशेल दुर्लक्ष केले. फडणवीस सरकार शेतकरी बांधवांच्या पाठीवर हात ठेवून फक्त लढ म्हणणारे नाही. प्रत्यक्ष कृतीतूनच राज्य सरकार सकारात्मकता दाखवेल यात शंका नाही.**

# नागोठण्याची जागृत ग्रामदेवता जोगेश्वरी माता



रोहा तालुक्यातील नागोठणे गावचे जागृत आराध्य, ग्रामदेवता भक्तांच्या हाकेला धावून जाणारी श्री जोगेश्वरी माता नागोठणे येथील निसर्गरम्य तीन तलावांच्या मध्यभागी वास्तव करीत आहे. मंदिरात श्री जोगेश्वरी मातेची मूर्तीसह श्री भैरवनाथ महाराज व श्री व्याघ्रेश्वर महाराज यांच्यादेखील मूर्ती आहेत. शारदीय नवरात्रौत्सवाच्या निमित्ताने मंदिर व परिसरात मनमोहक अशी विद्युत रोषणाई करण्यात आली आहे.

या नवरात्रोत्सवात दररोज सायंकाळी महाआरती, हरिपाठ, रास गरबा याबरोबरच विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. जोगेश्वरी मातेच्या नवरात्रोत्सवात शहर व परिसरातील तसेच रायगड जिल्ह्यातील हजारो भाविक, माहेरवाशिणी मातेच्या दर्शनासाठी, ओटी भरण्यासाठी मंदिरात येत असतात.

नागोठणेकरांची ग्रामदेवता श्री जोगेश्वरी मातेची आख्यायिका अशी सांगितली जाते की, अनेक वर्षांपूर्वी नागोठणे गावच्या हद्दीतील मुरावाडी येथील रहिवासी हिरू ताडकर हे आपली गुरे चरण्यासाठी डोंगरपठारावर गेले असता, त्या ठिकाणी त्यांना कोणीतरी हाक मारत असल्याचा भास झाला. दुसऱ्या दिवशीही त्याच ठिकाणी पुन्हा तसाच कोणीतरी हाक मारत असल्याचा भास झाला. या ठिकाणी येणारा आवाज हा कुणाचा असेल याचा विचार करीत ते घरी आले. ताडकर हे रात्री झोपले असताना त्यांना देवीने स्वप्नात येऊन दृष्टांत दिला आणि त्यांना सांगितले की, तू रोज ज्या ठिकाणी गुरे चरायला घेऊन जातोस त्या ठिकाणी मी आहे. मला तुझ्या गावी घेऊन चल. तुझ्या गावी घेऊन जात असताना मी ज्या ठिकाणी तुला जड लागेल त्या ठिकाणी मला उभ्याने टाकून दे. दुसऱ्या दिवशी नेहमीप्रमाणे तारकर डोंगरपठारावर गेले असताना देवीने सांगितलेल्या ठिकाणी गेल्यावर तिथे देवीची पाषाणरुपी मूर्ती दिसली. मोठ्या श्रद्धेने त्यांनी ती मूर्ती डोक्यावर घेतली व चालत निघाले. दरम्यान, नागोठणे येथील तीन तळ्याच्या मध्यभागी आल्यावर त्यांना मूर्ती जड वाटू लागली. त्यांनी विचार केला की, जर मूर्ती उभ्याने टाकली तर मूर्तीची तोडफोड होईल म्हणून त्यांनी मूर्ती हळूच खाली ठेवण्याचा प्रयत्न केला, परंतु मूर्तीचा भार ताडकर यांना सहन न झाल्याने मूर्ती खाली ठेवतानाच त्यांना मूर्तीचरणी मोक्षप्राप्ती झाली. त्यामुळे त्याच ठिकाणी मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली.

विशेष म्हणजे याठिकाणी सूर्य उगवताना व मावळताना सूर्यकिरणे मातेच्या स्वयंभू स्थानावर पडतात. ग्रामस्थांनी देवीचे छोटे मंदिर बांधून स्थापना केली. त्यामध्ये श्री जोगेश्वरी माता, भैरवनाथ महाराज व व्याघ्रेश्वर महाराजांची स्थापना केली. दरवर्षी नित्यनियमाने चैत्र पौर्णिमा म्हणजेच हनुमान जयंतीच्या दुसऱ्या दिवशी देवीचा पालखी उत्सव मोठ्या उत्साहात साजरा होत असतो. त्या वेळी संपूर्ण मंदिर परिसरात व तीन तळ्यांना विद्युत रोषणाई करण्यात येते. देवीचे भक्त मधुकर पोवळे यांनी विधीवत पूजा केल्यानंतर देवीची पालखी संपूर्ण गावात फिरविण्यात येते. आजही पालखी सोहळ्याच्या वेळी ताडकर कुटुंबियांना पहिला मान दिला जातो. या दरवर्षी साजऱ्या होणाऱ्या पालखी उत्सवानिमित्त दरवर्षी नागोठणे खडकआळी येथील ग्रामस्थ मंडळ देवीच्या ध्वजाची उंची काठी सजवून वाजत गाजत नाचत आणत मंदिरासमोर उभी करतात.

या पालखी उत्सवाच्या आदल्या दिवशी मंदिरांमध्ये श्री सत्यनारायणाच्या महापूजेचे आयोजन करण्यात येते. जवळजवळ चाळीस ते पन्नास लाख खर्च करून बांधलेल्या मंदिराची व नवीन मूर्तींची प्राणप्रतिष्ठापना व कलशारोहण सोहळा परंडामठाचे मठाधिपती गुरू रेवांसिद्ध, शिवाचार्य परंडकर महाराज यांच्या हस्ते २००१ रोजी करण्यात आला.

श्री जोगेश्वरी माता, भैरवनाथ महाराज व व्याघ्रेश्वर महाराजांच्या जुन्या मूर्ती ज्या विसर्जित केल्या होत्या त्या थोड्या दिवसांनी समुद्राच्या बाहेर आल्यावर त्या लोकांना दिसू लागल्या. याची कल्पना हरिहरेश्वर येथील नागरिकांनी नागोठणेवासीयांना दिली. त्यानंतर नागोठणे येथील ग्रामस्थ हरिहरेश्वर येथे जाऊन त्या मूर्ती नागोठणे येथे आणून नवीन मंदिराच्या समोर छोटे मंदिर बांधून त्यांची सन्मानपूर्वक स्थापना केली. श्री जोगेश्वरी मातेचचा पालखी सोहळा म्हणजे समस्त नागोठणेकरवासीयांसाठी एक क्षण उत्सव असतो या उत्सवाची वाट नागोठणेकर ग्रामस्थ एखाद्या चातकासारखी दरवर्षी वाट पाहत असतात.

सन १९९७मध्ये गावातील ग्रामस्थांनी नवीन मंदिर बांधण्याची कल्पना मांडली व ग्रामस्थांची एक जीर्णोद्धार कमिटी स्थापन करण्यात आली. गावातील व परिसरातील भाविकांनी मंदिरासाठी सढळ हस्ते मदत केली. रोहा तालुक्यातील नागोठणेजवळील मेढा येथील जोशी पुरोहितांच्या प्रमुख उपस्थितीत नागोठण्यातील ज्येष्ठ समाजसेवक कै. तात्यासाहेब टक्के यांनी सहपत्नी मंदिराच्या पायाभरणीचे पूजन केले व पुणे येथील वास्तू विशारद सुहास कारखानीस यांनी बनवलेल्या मंदिराच्या प्रतिकृतीप्रमाणे श्री जोगेश्वरी माता, भैरवनाथ महाराज व व्याघ्रेश्वर महाराज या मंदिरांसह त्यांचे शेजारी श्री गणेश व श्री मरिआई मंदिराचे सुंदर बांधकाम करण्यात आले आहे.

**–शामकांत नेरपगार**

# नात्यातील नि:शब्दता

काही नाती तुटत नाहीत, ती आपल्या नकळत मिटून जातात जशी बोटांवर रंग ठेवून फुलपाखरं हातून सुटून जातात...

चंद्रशेखर गोखले यांच्या या ओळी वाचल्यानंतर मन भूतकाळात जातं. जन्माला आल्यानंतर काही नाती आपोआप आपल्याला मिळतात आणि जसजसं वय वाढतं तसतशी काही नवीन नाती जोडली जातात.

प्रत्येक नात्याचं नाव वेगळं त्यानुसार त्यातील भावसुद्धा निराळे. कधी–कधी काही नाती इतकी त्रासदायक असतात की, तोडायची म्हटली तरी नकळतपणे आपला सतत पाठलाग करतच असतात, तर काही नाती हवीहवीशी असताना अचानक कुठेतरी लुप्त होतात.

जन्माला आल्यापासून शेवटच्या क्षणापर्यंत आपण अनेक माणसांना भेटतो आणि नकळतपणे त्यातील काही माणसांसोबत आपुलकीचे बंध तयार होतात. जिव्हाळ्याचे हे बंध तितक्याच तन्मयतेने जपायचे असतात. नाही तर रंगाचा बेरंग व्हायला वेळ लागत नाही.

ही नाती कशी बरं तयार होत असतील? बघा ना... कधी कधी आपण एकाच कार्यालयात वर्षानुवर्षे काम करून शेजारच्या टेबलावर कोण बसतं हे माहिती नसतं आणि कधी प्रवासात भेटलेला सहप्रवासी मनात घर करतो की त्याची पावलोपावली आठवण काढतो.

कधी कधी तर अवघ्या तासाभराच्या सोबतीमुळेसुद्धा असं एखादं नातं तयार होतं आणि ते इतकं जीवाभावाचं बनतं याची कल्पनासुद्धा कधी केलेली नसावी. इतका जीव त्या नात्याला लावलेला असतो. कधी भेट नाही, कसला संवाद नाही तरीही मनात खोलवर रूजलेलं नातं उमलतं, हळुवारपणे बहरतं. ज्यामध्ये गुंतणं नसलं तरी टाळणंसुद्धा नसतं. तरीही हवंहवंसं वाटणारं गोड नातं काळानुसार विणलं जातं.

जणू...
तुझं नी माझं नातं
मैत्रीच्या पलीकडचं
प्रेमाच्या थोडं अलीकडचं
भावनांनी घट्ट बांधलेलं
तरीही निःशब्द राहिलेलं...!

आणि अचानक या नात्याची वीण इतकी सैल होते की, समुद्राच्या लाटेप्रमाणे कधी विरून जातं कळतच नाही. जणू काही घडलंच नाही. असं असलं तरी त्या नात्यात ओतलेला जिव्हाळा संपतो का? तर नाही, कारण बोलणं बंद झालं तरी नातं संपत नाही आणि प्रेमही. मग दोन रूळांसाखा व्यवहार सुरू होतो, पण तोसुद्धा सोबतीनं.

तेव्हा 'चंगों'च्या ओळींचा अर्थ लागतो की, काही नाती तुटत नाहीत, तर फुलपाखरं जशी बोटांवर रंग ठेवून जातात. तशीच खूप साऱ्या गोड आठवणी देऊन काही नाती नकळतपणे मिटून जातात...कायमची निःशब्द होऊन जातात...

**–ऋतुजा म्हात्रे–महामुनी,**
पनवेल



## बदलते तंत्रज्ञान

# व्हॉट्सॲपकडून नवे फिचर रोल आऊट

ज्या ॲपमुळे जेन झी आणि सर्वमान्यांचा श्वासही रोखला जातो अशा महत्वाच्या व्हॉट्सॲपकडून युजर्ससाठी नवे फिचर लाँच करण्यात आले आहे. कंपनीने दिलेल्या माहितीनुसार, कंपनीने मेसेज ट्रान्सलेशनची घोषणा केली आहे, ही सुविधा १८०हून अधिक देशांमध्ये असलेल्या त्यांच्या तीन अब्जाहून अधिक लोकांच्या जागतिक वापरकर्त्यांमधील भाषेतील अडथळे दूर करण्यासाठी डिझाइन केलेली असल्याचे कंपनीने म्हटले.'आम्हाला आशा आहे की हे वैशिष्ट्य भाषेतील अडथळे दूर करण्या स मदत करेल आणि वापरकर्त्यांना जगभरातील प्रियजनांशी आणि समुदायांशी अधिक खोलवर जोडण्यास अनुमती देईल' असे कंपनीने नेमक्या शब्दात नव्या फिचरविषयी म्हटले आहे.





अँड्रॉइड आणि आयफोन वापरकर्त्यांसाठी व्हॉट्सॲप मेसेज ट्रान्सलेशन सुरू केले आहे ज्यामध्ये युजर्सला मोठा दिलासा मिळणे आता शक्य होणार आहे. हे वैशिष्ट्य (Feature) युजर अथवा वापरकर्त्यांना संदेश दीर्घकाळ दाबून ठेवण्याची आणि 'अनुवाद करा'वर (Do Translation) टॅप करून त्वरित त्यांच्या पसंतीच्या भाषेत रूपांतरित करण्याची परवानगी देते. ही कार्यक्षमता एका–एक चॅट (One to One Chat) गट संभाषण (Group Conversations) आणि चॅनेल अपडेटमध्ये काम करणार असल्याचे कंपनीने म्हटले. आता वापरकर्ते भविष्यातील भाषांतरांसाठी त्यांच्या निवडलेल्या भाषादेखील जतन करू शकतात असे कंपनीनं म्हटले.

मॅन्युअल भाषांतरांव्यतिरिक्त. अँड्रॉइड वापरकर्ते संपूर्ण चॅट थ्रेडसाठी स्वयंचलित भाषांतर चालू करण्यास सक्षम असतील, जेणेकरून येणारे सर्व संदेश डीफॉल्टनुसार भाषांतरित केले जातील. हा पर्याय बहुभाषिक समुदायांमध्ये संभाषणे अधिक सुलभ करण्यासाठी आहे. व्हॉट्सॲपने स्पष्ट केले की भाषांतरे वापरकर्त्यांच्या डिव्हाइसवर स्थानिक पातळीवर होतात, ज्यामुळे कंपनी स्वतः प्रक्रियेदरम्यान संदेशांमध्ये प्रवेश करू शकत नाही किंवा पाहू शकत नाही याची खात्री होते. हे व्हॉट्सपच्या एंड–टू–एंड एन्क्रिप्शन आणि वापरकर्त्यांच्या गोपनीयतेवर सतत लक्ष केंद्रित करते.

मर्यादित संख्येच्या भाषांसह सुरुवात करून, हे वैशिष्ट्य हळूहळू सादर केले जात आहे. अँड्रॉइडवर, भाषांतर सहा भाषांमध्ये उपलब्ध असेल.

# समाजसुधारक राजा राममोहन रॉय

राजा राममोहन रॉय हे एक भारतीय समाजसुधारक होते. त्या काळात प्रशासनासाठी वापरली जाणारी भाषा पर्शियन व अरेबिक होती. त्यामुळे या भाषा शिकण्यासाठी वडिलांनी त्यांना पाटणा येथे पाठविले. अरबी आणि फारसी भाषांबरोबरच त्यांनी इस्लाम धर्म आणि सुफी पंथ, शायर आणि शायरी यांचादेखील अभ्यास केला. हाफीज आणि सादी हे त्यांचे आवडते शायर होते. आज राजा राममोहन रॉय यांचा स्मृतीदिन आहे. त्यानिमित्त जाणून घेऊया त्यांच्याविषयी या लेखातून...



## निमित्त

पाटण्याचे शिक्षण पूर्ण केल्यावर वयाच्या बाराव्या वर्षी जिच्या माहेरची मंडळी प्रामुख्यान पौरोहित्य करणारी होती, त्या आपल्या आईच्या आग्रहामुळे, हिंदु धर्माचे शिक्षण घेण्यासाठी म्हणून राममोहन रॉय यांना काशीला पाठवण्यात आले. तिथे त्यांनी संस्कृत भाषेबरोबरच वेद, वेदान्त, उपनिषदे अशा गोष्टींचा अभ्यास केला. सोळाव्या वर्षापर्यंत त्यांनी बनारसमधे वास्तव्य केले. त्यानंतर ते बौद्ध धर्माचा अभ्यास करण्यासाठी बनारसला व नंतर तिबेटमध्ये गेले. पर्शियन लिपीत व अरेबिक भाषेत त्यांनी 'वेदान्त' ग्रंथ नावाचे पहिले पुस्तक लिहिले. १८१५ मध्ये कलकत्ता येथे परतल्यावर त्यांनी 'वेदान्त' ग्रंथाचे बंगाली भाषेत भाषांतर केले.

घरी परतल्यावर त्यांनी तुहफतूल मुवाहीद्दीन (एकेश्वरवाद्यांना भेट) नावाचा अरबीत प्रस्तावना असणारा एक लेख फारसीमधे लिहिला. त्यामधे त्यांनी मूर्तिपूजेवर कडाडून टीका केली होती. त्यांच्या मते मूर्तिपूजा ही वेदांच्या शिकवणुकीच्या विरुद्ध होती. त्या लेखामुळे वडिलांशी त्यांचे पटेनासे झाले आणि ते घर सोडून निघून गेले.

मुगल सम्राट दुसरा अकबर याने राममोहन रॉय यांना राजा ही उपाधी बहाल केली. मुगल सम्राटचे राजदूत म्हणून ते इंग्लंडला गेले होते. भारतातून इंग्लंडला जाणारे ते पहिले भारतीय होते. राजा राममोहन रॉय यांना भारतात नवविचाराचे जनक म्हटले जाते. त्यांनी सर्वप्रथम ब्रह्मपत्रिकानावाचे वृत्तपत्र सुरू केले.

राजा राममोहन रॉय ह्यांनी मूर्तिपूजेला, देवदेवतांच्या पूजेला विरोध केला. जीवसृष्टीचा निर्माता एकच आहे व तो निर्गुण, निराकार आहे,असे ते मानत. हिंदू धर्मातील कालबाह्य झालेल्या रूढी व परंपराना त्याचा विरोध होता. भारतातील समाजाला नवी दिशा देणे ही त्यांची इच्छा होती. त्यासाठी त्यांनी १८२८ साली ब्राम्हो समाजाची स्थापना केली. ख्रिश्चन धर्माचा आभ्यास केला. जुन्या प्रथा, परंपराविरुद्ध लढा दिला. भारतातील धर्मव्यवस्था, अर्थव्यवस्था, व शिक्षणव्यवस्था यासंदर्भात लेखन करण्यास सुरुवात केली. त्यासाठी काही वृतपत्रे तसेच सुधारणा चळवळ सुरू केली. त्यांनी ४ डिसेंबर १८२१ रोजी संवाद कौमुदी हे बंगाली भाषेतील तर १२ एप्रिल १८२२ रोजी मिरातुउल अखबार हे पर्शियन वृतपत्र सुरू केले. त्यांनी १८२८ साली प्रेसिडेन्सी कॉलेज सुरू केले.

राजा राममोहन रॉय यांनी लॉर्ड विलियम बेंटिक या भारताच्या गव्हर्नर जनरलच्या साहाय्याने सन १८२९मध्ये भारतातील सतीची प्रथा कायद्याने बंद करवली.

**राजा राममोहन रॉय यांचे वर्तमानपत्र व साहित्य –**

तुहफत–उल–मुवहिद्दीन, वेदांत ग्रंथ (वेदांत सार), संवाद कौमुदी, मिरात उल अखबार, गौडिय व्याकरण, १८२४ साली बंगाली या भाषेत इतिहास व भूगोल इ. अनेक विषयांवर पुस्तकांचे लिखाण. **(साभार : विकिपीडिया)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# रिकाम्यापोटी लवंग चघळून खाण्याचे अद्भूत फायदे!

सकाळी रिकाम्यापोटी लवंग चघळून खाणे शरीरासाठी खूप फायदेशीर ठरू शकते. लवंग, ज्याचा वापर स्वयंपाक घरात विविध मसाले, फोडणी किंवा चहात चव वाढवण्यासाठी केला जातो, तो आयुर्वेदात देखील अत्यंत महत्वाचा घटक मानला जातो. लवंगात असलेल्या नैसर्गिक गुणधर्मांमुळे त्याला आरोग्यवर्धक असे अनेक फायदे प्राप्त होतात. यामध्ये जीवनसत्त्वे, खनिजे, फायबर्स, अँटीऑक्सिडंट्स आणि इतर आवश्यक पोषणतत्त्वे समाविष्ट आहेत, ज्यामुळे लवंग केवळ चविष्टच नसून आरोग्यदायक देखील आहे. लवंगाच्या उपयोगाचे विविध फायदे



१) रोगप्रतिकारशक्तीला बूस्ट : आयुर्वेदानुसार, लवंगात असलेले अँटीऑक्सिडंट्स आणि व्हिटॅमिन उ रोगप्रतिकारक शक्ती वाढवण्यासाठी अत्यंत प्रभावी आहेत. हे शरीराच्या पांढऱ्या रक्तपेशींच्या निर्मितीला चालना देऊन आपल्याला सर्दी, फ्लू, आणि इतर संसर्गजन्य आजारांपासून बचाव करण्यात मदत करतात.

२) श्वासाची दुर्गंधी कमी करणे : लवंगाच्या अँटी–बॅक्टेरियल गुणधर्मांमुळे श्वासातील दुर्गंधी दूर होऊ शकते. लवंग चघळल्याने तोंडातील लाळचे प्रमाण वाढते आणि त्यातून बॅक्टेरियाचा नाश होतो.

३) यकृताच्या निरोगी कार्यास सहाय्य : यकृताच्या आरोग्यासाठी लवंग अत्यंत लाभकारी ठरतो. यकृताचे कार्य सुधारण्यासाठी लवंगाचे सेवन मदत करते, तसेच शरीरातील अशुद्धता आणि विषारी पदार्थ बाहेर टाकण्यास मदत करतो.

४) दातदुखीला आराम : लवंगात युजेनॉल नावाचे एक घटक असतो, जो दातदुखी कमी करण्यास मदत करतो. लवंग चघळल्याने दातांचे आरोग्य सुधारते आणि दातदुखीचा त्रास कमी होतो. दातदुखीच्या स्थितीत लवंगाची काडी दाढीखाली ठेवल्याने देखील आराम मिळतो.

५) सर्दी–खोकल्यावर नियंत्रण : लवंगाच्या अँटी–इंफ्लेमेटरी आणि अँटी–बॅक्टेरियल गुणधर्मांमुळे सर्दी आणि खोकला कमी होऊ शकतो. लवंग श्वसन तंत्रावर सकारात्मक प्रभाव टाकते आणि खोकल्याचा त्रास कमी होतो.

दररोज सकाळी रिकाम्या पोटी लवंग चघळून खाल्ल्याने आपल्या शरीराच्या अनेक आरोग्यविषयक समस्यांवर नियंत्रण मिळवता येऊ शकते. यामुळे शरीर अधिक ताजेतवाने आणि निरोगी राहते.

# आर्टिफिशियल इंटेलिजन्स लॅबचे पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या हस्ते उद्घाटन

**मोहोपाडा, रसायनी: प्रतिनिधी**

रसायनी पाताळगंगा औद्योगिक परिसरातील लोहोप तळवली येथील बिर्ला कार्बन इंडिया प्रा. लिमिटेड यांच्या सामाजिक बांधिलकी उपक्रमांतर्गत उभारण्यात आलेल्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स लॅबचे उद्घाटन पोलीस अधीक्षक रायगड आंचल दलाल यांच्या शुभहस्ते व बिर्ला कार्बन कंपनीचे युनिट हेड रवींद्र कुमार रघुवंशी यांच्या अध्यक्षतेखाली सरनौबत नेताजी पालकर विद्यामंदिर चौक शाळेत मोठ्या उत्साहात झाले.



याप्रसंगी शाळेच्या प्रवेशद्वारात प्रमुख अतिथी व सर्व मान्यवरांना आर.एस.पी. च्या विद्यार्थ्यांनी संचालनातून मानवंदना दिली. त्यानंतर प्रमुख अतिथींच्या शुभहस्ते नामफलकाचे अनावरण फित कापून केले. तसेच गणेश पूजन व दीपप्रज्वलन करून ए.आय. लॅबचे उद्घाटन करण्यात आले.

जिल्हा पोलिस अधिक्षक आंचल दलाल यांनी सांगितले की, शाळेत प्रवेश करताना आर एस पीच्या विद्यार्थ्यांनी संचलनातून दिलेली मानवंदना कौतुकास्पद होती. तसेच बिर्ला कंपनीच्या माध्यमातून उभारण्यात आलेल्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स लॅबमुळे चौक व परिसरातील विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञान शिकण्याची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. यातून निश्चितच विद्यार्थी शिकतील व त्यांना या क्षेत्रात प्रगती करण्याची प्रेरणा मिळेल.या ए.आय. लॅबमुळे ग्रामीण व शहरी भागातील विद्यार्थ्यांना डिजिटल युगातील नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करण्याची मोठी संधी मिळणार आहे. त्यामुळे चौक परिसरातील शैक्षणिक वातावरणात एक महत्त्वपूर्ण पाऊल टाकले जात आहे.

समारंभाचे अध्यक्ष तथा युनिट हेड रवींद्रकुमार रघुवंशी यांनी अध्यक्षीय मनोगतात बिर्ला कंपनी सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रात तसेच गाव आणि आदिवासी भागात सातत्याने करत असलेल्या कार्याची माहिती दिली. याप्रसंगी उपविभागीय पोलीस अधिकारी खालापूर डॉ.विशाल नेहुल, संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. अविनाशजी देशमुख,चौक ग्रामपंचायत सरपंच रितू ठोंबरे,बिर्ला कार्बन कंपनीचे एच आर हेड निखिल भांबरे, सेफ्टी मॅनेजर सुरेंद्र घोगरे,संस्थेचे उपकार्याध्यक्ष नरेंद्र भाई शहा सेक्रेटरी योगेंद्रभाई शहा,सी. एस.आर. प्रमुख लक्ष्मण मोरे,पोलीस निरीक्षक सचिन पवार, पोलीस उपनिरीक्षक शिवाजी जुंदरे,अभियांत्रिकी विभाग प्रमुख पूर्णेद्रोकुमार,संदीप कुमार,हरेश रावत,प्रशांत गायकवाड शाळेचे मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन शाळेचे मुख्याध्यापक दिलीप मोळीक यांनी केले, तर सूत्रसंचालन अनिल बडेकर व मयुरी शिरोडकर यांनी कौशल्यपूर्ण रीतीने पार पाडले.


## शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी गुन्हा दाखल

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरुड तालुक्यातील ऊसरोली ग्रामपंचायत कर्मचारी व ग्रामपंचायत अधिकारी प्लास्टिक पिशव्यांवर तपासणी आणि दंडात्मक कारवाई सुरु असताना एका इसमाने अचानक घटनास्थळी येऊन ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना धक्काबुक्की केली तसेच शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली. वास्तविक पहाता सदरील इसमाचा कोणताही संबंध नसताना विनाकारण वाद ओढवून घेतला.

या बाबतचे सविस्तर वृत्त असे की,शासनाकडून आलेल्या सूचनेनुसार ग्रामपंचायत अधिकारी चैतन्य खैरनार व ग्रामपंचायत कर्मचारी हे आपल्या ग्रामपंचायत हद्दीतप्लास्टिक पिशव्यांवरील सरकारी कारवाईसाठी ईश्वरी वडापाव दुकानात गेले होते. राज्य शासनाच्या निर्देशानुसार गावात प्लास्टिक पिशव्यांवर बंदी असल्याने तपासणी केली जात होती. तपासणीदरम्यान दुकानात प्लास्टिक पिशवी आढळल्याने संबंधितांवर दंडात्मक कारवाई सुरु होती.

याचवेळी कैलास पाटील हा इसम तिथे येऊन शासनाने दिलेले आदेश काटेकोरपणे पाळण्यासाठी कर्मचारी काम करत असतात. अशा वेळी त्यांना धमकावणे किंवा धक्काबुक्की करून त्यांना दमदाटी करू लागला. ग्रामपंचायत कर्मचारी हे लोकसेवक असून ते सरकारी कामकाज करत असल्याचे माहित असूनही, मुद्दाम त्यांच्यासोबत धक्काबुक्की केली. एवढ्यावरच न थांबता आरोपीने शिवीगाळ केली आणि मारण्याची धमकी देत सरकारी कामात अडथळा निर्माण केला.




याबाबत मुरुड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून मुरुड पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक परशुराम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हवालदार अंकुश सोळसे अधिक तपास करीत आहेत.

## सार्वजनिक नवरात्रोत्सवाला आमदार महेश बालदी यांच्या भेटी

**चौक : प्रतिनिधी**

उरण विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांनी चौक परिसरातील सार्वजनिक नवरात्र उत्सव मंडळातील देवींचे दर्शन घेतले आणि मनोभावे पूजा आरती केली.

चौक परिसरात आणि गावात सार्वजनिक नवरात्र उत्सव सुरू असून काहींच्या घरी कुलदैवतांची घटस्थापना करण्यात आली आहे. आमदार महेश बालदी यांनी सार्वजनिक नवरात्र उत्सव व घरगुती घटस्थापना यांना भेटी देऊन दर्शन करून मनोभावे पूजा आरती केली. त्यांचा सन्मान करण्यात आला. यावेळी सरपंच रितू ठोंबरे,खालापूर मंडळ अध्यक्ष प्रवीण मोरे, माजी जि.प. सदस्य मोतीराम ठोंबरे,जेष्ठ नेते विनोद भोईर,जगदीश हातमोडे, दर्शन पोळेकर,सचिन मते, दत्ता मांडे,नितीन तवले चौक शहर अध्यक्ष गणेश कदम, चौक उप सरपंच सौ पूजा हातमोडे, सदस्य वृषाली पोळेकर, गिरीश जोशी यांच्यासह अनेक कार्यकर्ते उपस्थित होते.



## कर्जतमध्ये दांडिया नाईटमध्ये महिलांनी केला जल्लोष

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील सुधाकर घारे फाउंडेशनच्या वतीने नवरात्रोत्सवानिमित्त भव्य दांडिया नाईटचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये महिलांनी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवून खेळाचा आनंद घेतला. अभिनेत्या अनुष्का सरकटे यांच्या उपस्थितीमुळे दांडिया नाईटमध्ये महिलांनी सहभागी होत जल्लोष केला.

कर्जत शहरातील पोलीस मैदानात दांडिया नाईटचे आयोजन करण्यात आले होते. गरबा खेळताना स्वर बरसात इव्हेंट प्रस्तुत मराठी – हिंदी गाण्यावर महिलांनी ताल धरला होता. यावेळी विविध स्पर्धा घेण्यात आल्या. त्यामध्ये भिसेगाव येथील रिना विकास लाड यांना उत्कृष्ट दांडिया ड्रेस देऊन सन्मानित करण्यात आले. दांडिया मध्ये सहभागी झालेल्या सर्व महिलांना भेट वस्तू देण्यात आली तर लकी ड्रा मध्ये विजेत्या झालेल्या महिलांना पारितोषिके देण्यात आली. अभिनेत्या अनुष्का सरकटे यांच्या उपस्थितीमुळे या कार्यक्रमातील महिलांचा उत्साह द्विगुणित झाला. सरकटे यांनी उपस्थित महिलांना शुभेच्छा दिल्या.



याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला जिल्हाध्यक्ष उमा मुंढे, माजी सरपंच नमिता घारे, तालुका महिलाध्यक्षा ॲड. रंजना धुळे, शहर महिलाध्यक्ष मधुरा चंदन, माजी नगरसेविका अश्विनी दिघे, सई वारे, भारती पालकर, सुवर्णा निलधे, मनीषा ठोंबरे, रजनी बैलमारे, मनीषा देशमुख, युक्ता भोपतराव आदी उपस्थित होत्या.

## मुरूडच्या गारंबी धरणाचा परिसर केला चकाचक!

**मुरुड : प्रतिनिधी**

मुरूड जंजिरा नगरपरिषदेचे मुख्याधिकारी सचिन बच्छाव यांच्या मार्गदर्शनाखाली गारंबी येथे स्वच्छता हि सेवा २०२५ अंतर्गत एक दिवस एक तास एकसाथ स्वच्छता अभियान राबविण्यात आले.आज सकाळी शहरापासून ८ किलोमीटर अंतरावर पर्यटन क्षेत्र असलेला नवाब कालीन गारंबी धरणाचा संपूर्ण परिसर स्वच्छ व सुंदर करण्यात आला. व त्याच परिसरात वृक्षारोपण करण्यात आले.



यावेळी नगरपरिषदेचे प्रशासकीय अधिकारी नंदकुमार आंबेतकर पाणी पुरवठा अभियंता सोनल पाटील ,बांधकाम अभियंता अनिकेत वाजे, शहर समन्वयक सचिन कोरके ,गाळणी चालक पल्लवी डोंगरीकर ,मुकादम अभिजीत चांदोरकर, स्वप्नजा विरुकुड ,अक्षता तुळसकर ,विजय सुर्वे ,जयकृष्ण भिसे, सतेज निमकर ,स्मिता मुरुडकर, पाणी पुरवठा कर्मचारी व सफाई कर्मचारी इत्यादी उपस्थित होते.

मुरुड शहरातील सुमारे १७ हजार लोकवस्तीला ११० वर्षांपूर्वी बांधलेल्या नवाब कालीन गारंबी धरण हे जंगल भागात असल्याने व या धरणाला संरक्षण भिंत नसल्याने पावसाळ्यात पडणारे पाणी डोंगरातील माती घेऊन या धरणात समाविष्ट झाल्याने सदरील धरणात गाळ जमत असतो.तसेच जंगलं भागात अनेक वृक्ष असल्याने या धरणात झाडांचा पालापाचोळा पडत असतो.लोकांना शुद्ध पाणी व सदरच्या पाण्याचा पुरवठा दीर्घ काळ टिकून राहावा.यासाठी याठिकाणी स्वछता मोहिमेस अधिक प्राधान्य देण्यात आले आहे.३ टना पेक्षा पालापाचोळा तसेच वाहत्या पाण्याला अडथळा आणणारी मोठी दगडे बाजूला सारून पाण्याचा प्रवाह मोकळा करण्यात आला.शहराला गेली १०० वर्षाहून अधिक काळ ज्या धरणातून पाणीपुरवठा होतो ते धरण म्हणजे गारंबीचा धरण काळ्या जांभा दगडातून वाहून येणारे शुद्ध पाणी गेली अनेक वर्ष मुरुडच्या रहिवास पीत आहेत.



**खोपोली : भारतीय जनता पक्षाच्या मध्यवर्ती कार्यालयात संस्थापक अध्यक्ष पं. दीनदयाळ उपाध्याय यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. पक्षाचे ज्येष्ठ नेते रमेश मुंडे यांनी उपस्थित राहून कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केले.**

## एनडीआरएफ, पोलीस व प्रशासनाचा रायगड रोप वेवर थरारक बचाव सराव

**महाड: प्रतिनिधी**

रायगड रोपवेवर गुरुवारी आपत्कालीन परिस्थितीत तातडीने मदत व बचावकार्य कसे करावे, याचा प्रत्यक्ष सराव करण्यासाठी थरारक मॉक ड्रिल घेऊन. दोरीच्या साहाय्याने प्रवाशांचा बचाव करण्याचा सराव एनडीआरएफ, पोलीस, अग्निशमन दल, आरोग्य विभाग आणि प्रशासनाच्या संयुक्त सहभागातून हिरकणी वाडी येथे पार पडला.

रायगड रोपेच्या हिरकणी वाडी येथे या सरावावेळी एनडीआरएफ ०५ बटालियन पुणेचे सहाय्यक कमांडर निखिल मुद्होळकर, निरीक्षक अंकित कुमार, नितीन सोकाशी, महाड उपविभागीय पोलीस अधिकारी काळे, नायब तहसीलदार आर. निकम, रायगड रोपवे प्राधिकरणाचे एस. भालेराव आणि रायगड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अनिल देशमुख मान्यवर उपस्थित होते.

रायगड रोपेच्या हिरकणी वाडी येथे पार पडलेल्या या सरावात ९३ जवान व कर्मचारी सहभागी झाले. त्यामध्ये – एनडीआरएफ पथकाचे : २७,अग्निशमन दलाचे : १५,रायगड रेस्क्यू टीमचे सदस्य : ३०,रायगड पोलीस दलातील : १०,आरोग्य विभागातील : ०६

याशिवाय २ रुग्णवाहिका आणि १ अग्निशमन वाहन या मॉक ड्रिल च्या वेळी तैनात करण्यात आले होते.






## घरगुती विद्युत उपकरणांची तपासणी व दुरुस्ती कार्यशाळा



**तळा : प्रतिनिधी**

जी एम. वेदक महाविद्यालय, तळा येथील नुकतेच भौतिकशास्त्र विभाग व इंटर्नल क्वालिटी श्युरन्स सेल (खट–उ) यांच्या संयुक्त विद्यमाने घरगुती विद्युत उपकरणांची तपासणी व दुरुस्ती या विषयावर एक दिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून डिप्लोमा इन इलेक्ट्रॉनिक्स नागेश सावंत यांनी विद्यार्थ्यांना घरगुती विद्युत उपकरणांची कार्यपद्धती, तपासणी पद्धती तसेच किरकोळ बिघाडांची दुरुस्ती या संदर्भात सविस्तर मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून तांत्रिक कौशल्य प्राप्त व्हावे व स्वयंपूर्णता वाढावी हा या कार्यशाळेचा उद्देश होता.

या कार्यशाळेच्या आयोजनासाठी प्रा. विजय रायकर (विभागप्रमुख, भौतिकशास्त्र विभाग), प्रा. विवेक राणे (खट–उ), प्रा. परशुराम अभंगे तसेच प्रा. किरण गावडे यांनी प्रयत्न केले.कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी महाविद्यालय व्यवस्थापन, प्राचार्य, प्राध्यापकवर्ग तसेच कर्मचारी यांचे सहकार्य लाभले आहे.


## जाहीर नोटीस

सर्व लोकांस कळविण्यात येते की, **मौजे आंबिवली, ता. पनवेल, जि, रायगड** येथील खालीलप्रमाणे वर्णन केलेल्या मिळकतीचे सर्व हक्क आमचे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन व विदयमान कब्जेदारांची नावे खालीलप्रमाणे

**मौजे आंबिवली, ता. पनवेल, जि, रायगड**

| भोगवटादाराचे नाव/हिस्सेदार | गट/सर्व्हे भूमापन. नं. | हिस्सा/ उपविभाग नं. | क्षेत्र हे– आर.चौ.मी. | आकार रू–पैसे |
|---|---|---|---|---|
| श्री. बाळाराम शंकर पाटील | ९ | ६ | ०–३९–७० जिरायत | ८–२५ |
| | | पो. ख. | ०–०१–५० | |
| | | एकुण | ०–४१–२० एकूण यापैकी ०–४०–४० हे.आर.पॉ. म्हणजेच ४०.४० गुंठे एवढया क्षेत्राचा विक्री व हस्तांतरणाचा व्यवहार | |

वरील वर्णन केलेल्या मिळकतीचे सर्व हक्क आमचे अशिलांनी कायमस्वरूपी खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे ठरविले आहे.

वरील मिळकतीबाबत अन्य कोणाचाही दान, गहाण, बोजा, बक्षिस, साठेकरार, विकसनकरार, वचनचिठ्ठी, बयाणा पावती, फरोक्त, ट्रस्टी, पोटगी, वारसा भाडेपट्टा, वहिवाट व तत्सम कोणत्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी आपल्या लेखी हरकती प्रथम दर्शनी पुराव्यासाहित सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून १४ **(चौदा)** दिवसांचे आत खालील सही करणार यांचेकडे पाठवाव्यात.

वरील मुदतीत हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहित आहे, असे समजण्यात येऊन सदरहू मिळकती संदर्भात आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. सदर दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची स्पष्ट नोंद घ्यावी.

**पनवेल,**
**दि. २७/०९/२०२५**

**सही/–**
**(सतिश बाळाराम गवते)**
**वकील.**
पत्ता: ऑफिस नं. ६४, तळमजला,
सेक्टर–१, महालक्ष्मी शॉपिंग सेंटर,
महालक्ष्मी नगर, मु. पो. नेरे, ता. पनवेल,
जि. रायगड, महाराष्ट्र ४१० २०६,
फोन नं. ९१३७५००४५१.

# नवी मुंबईतील शिल्पाकृती झाल्या चकाचक

## महापालिकेतर्फे स्वच्छता ही सेवा अभियान



**नवी मुंबई : बातमीदार**

स्वच्छ व सुंदर शहर ही नवी मुंबईची सर्वदूर ओळख असून यामध्ये चौकाचौकांमध्ये असलेल्या आकर्षक शिल्पाकृतींचे महत्त्वाचे योगदान आहे. ठिकठिकाणी लावण्यात आलेल्या बहुतांशी शिल्पाकृती त्या परिसराची वैशिष्ट्ये लक्षात घेवुन लावण्यात आली असून, जसे की – शाळा, महाविद्यालय, ग्रंथालये याजवळ पुस्तके वाचणारी मुले तसेच खेळांच्या मैदानांच्या परिसरात खेळांचे विविध साहित्य अथवा खेळणारी मुले – अशाप्रकारे पूरक शिल्पाकृती बसवून त्या परिसराचे सुशोभिकरण करण्यात आले आहे, त्यासोबतच त्या परिसराची वैशिष्ट्य अधोरेखित होईल, अशी शिल्पे बसविण्यात आली आहेत.

केंद्र सरकारच्या स्वच्छ भारत मिशन अंतर्गत १७ सप्टेंबरपासून 'स्वच्छता ही सेवा' अभियानास सुरूवात झाली असून २ ऑक्टोबरपर्यंत अभियानाच्या पंधरवडा कालावधीत आयोजित करावयाच्या दैनंदिन उपक्रमांचे महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनानुसार नियोजन करण्यात आले आहे. त्यास अनुसरून नवी मुंबई महापालिकेच्या आठही विभाग कार्यालय क्षेत्रात सार्वजनिक जागी असलेल्या शिल्पाकृतींची विशेष स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. मुख्य स्वच्छता अधिकारी राजेंद्र इंगळे तसेच सर्व विभागांचे सहाय्यक आयुक्त तथा विभाग अधिकारी व स्वच्छता अधिकारी, स्वच्छता निरीक्षक, उपस्वच्छता निरीक्षक यांच्या सहयोगातून स्वच्छताकर्मींच्या माध्यमातून सर्व विभागांमध्ये शिल्पाकृती स्वच्छता मोहीम प्रभावीपणे राबविण्यात आली. या मोहीमेमध्ये लोकसहभागही लाभला.

'स्वच्छता ही सेवा' अभियानांतर्गत दररोज विविध प्रकारचे स्वच्छता विषयक उपक्रम व सफाई मित्रांसाठी विविध कार्यक्रम राबविले जात आहेत. त्याला नागरिकांचा उत्तम सहभाग लाभत असून २ ऑक्टोबरपर्यंत आयोजित केल्या जाणाऱ्या उपक्रमांमध्ये नागरिकांनी स्वयंस्फुर्तीने सहभागी होऊन आपले मौलिक योगदान द्यावे, असे आवाहन महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे केलेआहे.

## साडेतीन लाखांच्या दागिन्यांवर डल्ला

**पनवेल : वार्ताहर**

नांदेड ते मुंबई असा खासगी बसने प्रवास करणाऱ्या एका तरुणाची सोन्याचे दागिने ठेवलेली बॅग प्रवासादरम्यान चोरी झाली आहे. ज्या वेळी हा तरुण प्रवासी उतरला त्या वेळेस त्याला याची माहिती मिळाली. याबाबत कामोठे पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवला आहे.

३० वर्षीय हा प्रवासी मुंबई येथील भायखळा येथे राहणारा आहे. कामोठे पोलिसांनी तक्रार नोंदविल्यानंतर संबंधित प्रवासी येत असलेल्या मार्गिकेवरील जेथे बस थांबली त्या थांब्यांवर बसमधून उतरलेल्या प्रवाशांची माहिती घेण्यास सुरुवात केली आहे.

## इसम बेपत्ता



**पनवेल :** घरातून ड्युटीवर जातो असे सांगून घराबाहेर पडलेले ५२ वर्षीय इसम कोठेतरी निघून गेल्याने ते हरवल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

जयचंद्र रामचंद्र (वय ५२ रा. मानसी पार्क, कोळखे पेठ) रंग सावळा, उंची ५ फुट २ इंच, बांधा सडपातळ, चेहरा लांबट, डोक्याचे केस काळे व पांढरे बारीक, डोळे काळे, नाक सरळ असून अंगातनेसणीस लाल व पांढऱ्या रंगाचे शर्ट व हिरव्या रंगाची फुल पॅन्ट पायात पावसाळी बूट असून त्यांना मराठी, हिंदी, मल्ल्यालम भाषा बोलता येते.

## पनवेल तालुका पोलीस ठाण्याला आयएसओ मानांकन



**पनवेल : वार्ताहर**

पनवेल तालुका पोलीस स्टेशनचे स्मार्ट वर्क आणि व्यवस्थापनाला मोठी पोहोच पावती मिळाली आहे. या पोलीस ठाण्याला आयएसओ मानांकन प्राप्त झाले असून दस्तूर खुद मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांना सर्टिफिकेट प्रदान करण्यात आले.

खारपाडा टोल नाका ते वावंजे, धोदानी, शिरवली त्याचबरोबर खालापूर तालुक्याची सीमा असा मोठा भाग पनवेल तालुका पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत येतो. नवनवीन गृहनिर्माण संकुल या परिसरात झालेले आहेत. त्याचबरोबर ग्रामीण भाग या पोलीस स्टेशनच्या हद्दीत येतो. त्यामुळे सहाजिकच येथे कायदा आणि सुव्यवस्था राखण्याची मोठी जबाबदारी तालुका पोलिसांवर आहे. दरम्यान असे असतानाही प्रत्येक आघाड्यांवर वरिष्ठ पोलीस निरीक्षक गजानन घाडगे यांच्या नेतृत्वाखाली कर्तव्य बजावण्यात आले आहेत.

या पोलीस ठाण्याची इमारतही प्रशस्त आहे. त्याचबरोबर साफसफाई आणि स्वच्छतेवर विशेष भर दिला जातो. पासपोर्ट, बारानिशी, वायरलेस, स्टेशन डायरी आदी विभागासाठी स्वतंत्र खोल्या आहेत. महिला व पुरुष आरोपीसाठी कोठडीची सुविधा आहे. महिला व पुरुषांसाठी स्वच्छतागृह आहे. सर्व खोल्यांमध्ये अद्यावत फर्निचर, पिण्याचे पाणी, स्वच्छ सूर्यप्रकाश सर्व विभागात संगणक, इंटरनेट, वायफाय, कॅमेरे आहेत.दाखल झालेल्या गुन्ह्यापैकी त्याचे अन्वेषण आणि प्रकटीकरणाचे प्रमाण सुद्धा चांगले आहे. गुन्हेगारांना जरब बसवण्यात पोलिसांना यश आले.

## दुर्गामाता दौड (माळ पाचवी)





पनवेल : श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानमार्फत पनवेलमध्ये दरवर्षी श्री दुर्गामाता दौड काढली जाते. शुक्रवारी पनवेलमध्ये तीन ठिकाणी दौड काढण्यात आली. पहिल्या दौडीची सुरवात जरीमरी आई मंदिर, सुकापूर, नवीन पनवेल येथून झाली. पुढे ही दौड सुकापूर गावात फिरून गावदेवीच्या मंदिरात आली. येथे आरती करून श्लोक घेण्यात आले व पुन्हा गावभर मार्गक्रमण करून जरी मरी आईच्या मंदिरात येऊन दौडीची सांगता करण्यात आली. दुसरी दौड ही करंजाडे गाव आणि सेक्टर भागात काढण्यात आली तसेच तिसरी दौड ही पनवेल तालुक्यातील डेरवली या गावात काढण्यात आली तसेच महाराष्ट्राच्या बाहेर गुजरात राज्यात कर्णावती या ठिकाणीदेखील दुर्गामाता दौड काढण्यात आली. पनवेलमध्ये रोज वेगवेगळ्या ठिकाणी अशी दौड काढण्यात येते. ज्यांना कोणाला या दौडीमध्ये सहभागी व्हायचे असेल त्यांनी अधिक माहितीसाठी शुभम साळुंखे (९७०२७०६२६२) यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## नवरंग — रंग हिरवा



चांगू काना ठाकूर हायस्कूल, नवीन पनवेल



मोरु नारायण म्हात्रे विद्यालय व तुकाराम नारायण घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स, उलवे नोड



सखी मंगळागौर ग्रुप, पनवेल



शेठ जे.नौ .पालीवाला महाविद्यालयातील कर्मचारी, पाली



कर्जत महिला मंडळ संचलित विद्या विकास मंदिर, कर्जत



सुषमा पाटील विद्यालय व जुनिअर कॉलेज आणि सीनियर नाईट कॉलेज, कामोठे



नवी मुंबई महापालिका मुख्यालय अधिकारी, कर्मचारी


॥ ॐ श्री बाळकृष्णाय नमः ॥

**देवसागर साधक समाज (इंचगिरी सांप्रदाय)**

श्री क्षेत्र नंदेश्वर, ता. मंगळवेढा, जि. सोलापुर.



**५५ वा पुण्यतिथी सप्ताह**

आश्विन शुध्द ५ ते आश्विन शुध्द ९ शके १९४७

शनिवार दि. २७/०९/२०२५

ते बुधवार दि. ०१/१०/२०२५

ॐ पूर्णमदः पूर्णमिदं पूर्णात पूर्णमुदश्यते ।
पूर्णस्य पूर्ण मादाय पूर्णमिवावशिष्यते ॥ (इशउपनिषद)
मावळवीत विश्वाभासू । नवल उदयाला चंडांशु ।
अव्दयाब्जिनी विकाशु । वंदू आता (अ -१६-ज्ञानेश्वरी)

या बंधुनो या हो या । सद्गुरु चरणी धावत या ॥
आपले सुखाचे आवडी या । शाश्वत सुखाचे आवडी या ॥
अभिमान टाकुनी या। मी पण सोडूनी या ॥
या बंधुनो या हो या । सद्गुरु भजनी धावत या ॥
( श्री माऊली उवाच )

**सविनय सादर नमस्कार,**

श्री क्षेत्र नंदेश्वर येथे सालाबादप्रमाणे अनंतकोटी ब्रम्हांडनायक **श्री समर्थ सद्गुरु बाळकृष्ण महाराज** यांचे पुण्यतिथीनिमित्त आश्विन शु. ५ शनिवार दि. २७/०९/२०२५ रोजी **''अखंड हरिनाम सप्ताह''** प्रारंभ **श्री दासबोध** व **श्री बाळकृष्ण चरित्रामृत** ग्रंथाचे पारायण, वीणापूजन, तसेच मंगळवार दि. ३०/०९/२०२५ रोजी दुपारी ठिक ४.०० वा. माऊलीची पालखी व रथाची भव्य सवाद्य मिरवणूक आणि हरिजागर, आश्विन शुध्द ९ बुधवार दि. ०१/१०/२०२५ रोजी दुपारी ठिक १२.०० वा. पुष्पवृष्टी होणार आहे.

तरी सर्व भाविक-भक्तांनी बहुसंख्येने उपस्थित राहून, श्री गुरुसेवेत सहकार्य करुन श्री समर्थ सद्गुरु माऊलीचे वैभव वाढवावे व भक्तीज्ञानाचा लाभ घेऊन आपले पारमार्थिक जीवन सफल करावे, ही नम्र विनंती !

सप्ताहाचे निमंत्रण आपल्या आसपासच्या परिचित गुरु, बंधु-भगिनींना द्यावे.

**दिनक्रम**

| | | | |
|---|---|---|---|
| पहाटे ४.०० ते ५.०० वा. | काकड आरती | दुपारी ३.०० ते ६.०० वा. | प्रवचने, पारमार्थिक व्याख्याने व भजन |
| सकाळी ५.०० ते ६.०० वा. | प्रभात फेरी | सायं. ६.०० वा. | सायंकाळची आरती |
| सकाळी ७.०० ते ८.०० वा. | 'श्री' ची महापुजा | रात्री ७.०० ते ८.०० वा. | श्री भागवत वाचन व ध्यान |
| सकाळी ८.०० ते ९.०० वा. | श्री भागवत वाचन व ध्यान | रात्री ८.०० ते १०.०० वा. | संगीत भजन |
| सकाळी ९.०० ते १०.०० वा. | संगीत भजन | रात्री १०.०० ते १२.०० वा. | किर्तन-प्रवचन व बारा अभंग |
| सकाळी १०.०० ते १२.०० वा. | प्रवचन व दुपारची आरती | | |

या सोहळ्यात अनेक ठिकाणाहून संत सत्पुरुष उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या अमृतवाणी श्रवणाचा व सद्गुरु सेवेचा लाभ पदरी घ्यावा व जन्माचे सार्थक करावे !

गुरुचरणी ठेविता भाव । आपें आप भेटे देव ॥ (संत तुकाराम)
दिसो परतत्व डोळा । पाहो सुखाचा सोहळा रिघो माहाबोधू सुकाळा । माजी विश्व ॥ (ज्ञानेश्वरी)

श्री माऊली सप्ताहचे व्हिडिओ पाहण्यासाठी DSSM यूट्यूब चॅनल व DSSM फेसबुक पेजला सबस्क्राईब करा

# खालापुरात पोलीस मदत केंद्राचे उद्घाटन

**चौक : प्रतिनिधी**

खालापूर पोलीस ठाण्याच्या अंतर्गत वावोशी दुरक्षेत्रातील खांबेवाडी इमॅजिका पार्क येथे नवीन पोलीस मदत केंद्राचे उद्घाटन रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांच्या हस्ते करण्यात आले.




वावोशी ते खालापूर हे अंतर साधारण १८ ते २० किमी आहे. त्यामुळे त्वरित दळणवळण शक्य होत नाही. दरम्यान, खांबेवाडी इमॅजिका येथे पोलीस चौकी असावी अशी अनेक दिवसांची मागणी होती. ही चौकी उभी करण्यास इमॅजिका वॉटर पार्क व परिसरातील लोकांचे सहकार्य मिळाले. या चौकीच्या मार्गावर अष्टविनायक क्षेत्र पाली हे ठिकाण असून जवळच ऐतिहासिक उंबरखिंड आहे. इमॅजिका वॉटर पार्क येथे पर्यटकांची मोठी गर्दी असते. परिसरातील गावे थोड्याफार फरकाने दुर्गम भागात आहेत. त्यामुळे या मार्गावर वर्दळ असते. वाहतूक कोंडीचे प्रसंगदेखील असतात. त्यामुळे या चौकी महत्त्व आहे. या चौकीसाठी खालापूर पोलीस निरीक्षक सचिन पवार यांचे विशेष प्रयत्न होते.

सुप्रसिद्ध शिवव्याख्याते प्रशांत देशमुख यांनी उंबरखिंड येथील छत्रपती शिवाजी महाराज व सरनौबत नेताजी पालकर यांचा इतिहास सांगितला.

कार्यक्रमास उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. विशाल नेहुल, इमॅजिकाचे प्रमुख अमित पाटील, खोपोली पोलीस निरीक्षक हिरे, रसायनी पोलीस निरीक्षक संजय बांगर, सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष औटी, पोलीस उपनिरीक्षक शिवाजी जुंदरे, रायगड जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष भाई शिंदे, हेल्प फाऊंडेशनचे गुरुनाथ साठेलकर व त्यांची टीम, परिसरातील पोलीस पाटील, विविध संस्थांचे पदाधिकारी, कंपनीचे अधिकारी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जगदीश मरागजे यांनी केले, तर आभार सहाय्यक निरीक्षक संतोष औटी यांनी मानले.

# रोह्यात कुणबी जात प्रमाणपत्र वंचित कृती समितीची स्थापना

**रोहा : प्रतिनिधी**

रोहा तालुका कुणबी समाजाची बैठक नुकतीच झाली. या वेळी वंचित, गोरगरीब कुटुंबातील सदस्यांना जातीचा दाखला मिळवण्याकामी लढा देण्यासाठी कुणबी जात प्रमाणपत्र वंचित कृती समितीची स्थापना समाजाकरिता कायम योगदान देणारे अनंत थिटे यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्याचे सर्वानुमते ठरले.

कुणबी समाजोन्नती संघ ग्रामीण शाखा रोहा अध्यक्ष रामभाऊ सकपाळ, ओबीसी जनमोर्चा रायगड अध्यक्ष सुरेश मगर, समाज नेते ज्येष्ठ मार्गदर्शक शिवराम शिंदे, रायगड जिल्हा समन्वय समिती अध्यक्ष शिवराम महाबळे यांच्या प्रमुख उपस्थितीत कुणबी समाजाची बैठक झाली. या वेळी समाजाच्या जात प्रमाणपत्र प्रश्नाकरिता सक्रियपणे सहभाग घेणाऱ्या समाज बांधवांमधून समिती स्थापन करण्यात येऊन तिला मान्यता देण्यात आली. या कमिटीमार्फत हा प्रश्न सोडविण्यासाठी सर्वतोपरी सहकार्य, योगदान देण्याचे सर्व समाज बांधवांनी, पदाधिकाऱ्यांनी एकमुखाने ठराव घेतला.

रोहा तालुकास्तरीय नवनिर्वाचित कुणबी समाज जात प्रमाणपत्र पडताळणी वंचित कृती समितीमध्ये अध्यक्षपदी अनंत थिटे, कार्याध्यक्ष गजानन बामणे, सचिव निवास खरीवले, उपाध्यक्ष शशिकांत कडू, महेश बामुगडे, सहसचिव दिनेश धनवी, खजिनदार रमण कापसे, संघटक विजय पवार, संजय सानप, प्रवक्ते अजय कापसे, प्रवक्ते अरुण आगळे आदींची निवड करण्यात आली.

बैठकीस तालुका उपाध्यक्ष मारुती खांडेकर, सरचिटणीस सतीश भगत, खजिनदार, सुहास खरीवले, सहसचिव मोरेश्वर खरिवले, मारुती मालुसरे, गोपीनाथ गंभे, शांताराम महाडिक, वसंत मरवडे, खेळू ढमाळ, दिनेश रटाटे, ज्ञानेश्वर दळवी, राम महाडिक, मोंडे, शैलेश बाईत, येरूणकर, आत्माराम घरट, पाखर महिला अध्यक्ष दीपिका भगत, शिल्पा मरावडे, सौ. राऊत, सौ. रटाटे यांच्यासह समाजातील विविध विभागातून आलेले बांधव, भगिनी, युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चौक येथे शुद्ध पाण्याची सोय

**चौक : प्रतिनिधी**

नांदी फाऊंडेशन या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून चौक बाजारपेठेतील दगडी शाळेच्या आवारात आरओ हा शुद्ध पाणीपुरवठा करणाऱ्या उपक्रमाचा शुभारंभ सरपंच रितू ठोंबरे यांच्या हस्ते करण्यात आला.



कार्यक्रमास नांदी फाऊंडेशनचे सीईओ गॅलरी, राज्य सीईओ दिव्या, भाजपचे उत्तर रायगड उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, माजी जि.प. सदस्य मोतीराम ठोंबरे, चौक प्रभारी विशाल पवार, पोलीस उपनिरीक्षक शिवाजी जुंदरे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

विद्यार्थी, नागरिक यांना याचा जास्त लाभ होणार असून आठ रुपयात २० लिटर शुद्ध पाणीपुरवठा चोवीस तास उपलब्ध होईल, अशी माहिती ग्रामपंचायत अधिकारी गणेश मोरे यांनी दिली. आरओ शुद्ध पाणीपुरवठा उपक्रमाच्या बाजूलाच पाणपोईचे मोतीराम ठोंबरे यांच्या हस्ते करण्यात आले. ही पाणपोई सर्वांसाठी मोफत असणार आहे.

या वेळी उपसरपंच पूजा हातमोडे, भाजप वडगाव अध्यक्ष विनोद भोईर, उद्योजक जगदीश हातमोडे, सदस्य निखिल मालुसरे, सुभाष पवार, नैना झिंगे, प्राची दबके, ॲड. रिना सोनटक्के, लक्ष्मी वाघ, विशाल देशमुख, दत्ता मांडे, कर्मचारी, ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मोरे कॉलेजमध्ये एनएनएस दिन

**रोहा : प्रतिनिधी**

एम.बी. मोरे फाऊंडेशनचे सौ. वरदा सुनील तटकरे कला, वाणिज्य व विज्ञान महिला महाविद्यालय, धाटाव, रोहा येथे राष्ट्रीय सेवा योजना वर्धापन दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

या वेळी फाउंडेशनचे संचालक अशोक मोरे यांच्या हस्ते एनएसएसचे ध्वजारोहण करण्यात आले. प्राचार्य, प्राध्यापक आणि विद्यार्थिनी उपस्थित होत्या. यानंतर विद्यार्थिनींनी राजिप शाळा, किल्ला येथे पथनाट्य सादर केले. वर्धापन दिनानिमित्त या उपक्रमांचे नियोजन महाविद्यालयाच्या एनएनएस कार्यक्रम अधिकारी प्रा. ममता बिंद यांनी केले होते.

# पेणमध्ये बालविवाहविरोधी जनजागृती मोहीम

**पेण : प्रतिनिधी**

नवरात्रोत्सवाचे औचित्य साधून उत्सव नवरात्रीचा जागर नारीशक्तीचा या अंतर्गत बालविवाहविरोधी जनजागृती मोहिमेची सुरुवात होऊन दोन दिवस उलटून गेले असून पेण पोलीस ठाण्याच्या उपनिरीक्षक शिल्पा वेंगुर्लेकर यांनी हेमडी, खडकी, फणसवाडी, विनोबानगर या ठिकाणी मार्गदर्शन केले. बालविवाह करणे कायद्याने गुन्हा असून कायद्यासमोर सर्व समान आहेत. बाल विवाह केल्यास दोषींवर कायदेशीर कारवाई होईल, असे त्यांनी स्पष्ट केले.



## कायद्यासमोर सर्व समान -शिल्पा वेंगुर्लेकर

गुन्हा नोंद झाल्यावर मुलीच्या आणि मुलाच्या दोन्ही कुटुंबियांना त्रास सहन करावा लागतो असे सांगून वेंगुर्लेकर यांनी पोक्सो कायद्याचीदेखील माहिती चारही आदिवासी वाड्यांमध्ये दिली.

यानंतर पत्रकार संतोष पाटील यांनी बाल विवाह म्हणजे काय आणि ते करणे किती चुकीचे आहे याबाबत मत मांडले. पत्रकार राजेश कांबळे यांनीदेखील मनोगत व्यक्त केले.

या वेळी शांतता कमिटी सदस्य अमोल घोटणे, पोलीस कर्मचारी किशोर घरत, सामाजिक कार्यकर्ते सुनील वाघ, नरेश कडू, आशासेविका मुन्नी देशमुख, कविता भोसले, पांडुरंग पवार, संदीप पाटील, ॲड. जेधे आदी उपस्थित होते.

खडकी येथे पोलीस उपनिरीक्षक विकास नवरखेडे आणि विश्वास वाघ यांनीही मार्गदर्शन केले. उत्सव नवरात्रीचा जागर नारी शक्तीचा या अभियानाला गेल्या तीन दिवसात उदंड प्रतिसाद मिळत असून पेण पोलीस ठाणे शांतता कमिटी सदस्य, पत्रकार यांच्या या अभियानाला यश येत आहे.

# रोख रक्कम आणि चेक असलेली बॅग दिली शोधून

## *पाली पोलिसांची कार्यतत्परता*

**पाली : प्रतिनिधी**

मुंबईचे रहिवासी प्रमोद गणपत देऊळकर यांना पोलिसांच्या कार्यतत्परतेचा सुखद अनुभव आला. त्यांनी जमीन खरेदीसाठी आणलेली चार लाख रक्कम आणि बँकेचे चेक असलेली बॅग हरवली होती. पाली पोलिसांनी ती अर्ध्या तासात शोधून काढत देऊळकर यांना परत केली.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस उपनिरीक्षक अनिल गोसावी आणि पोलीस शिपाई गौरव भापकर यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी देऊळकर यांच्यासोबत ज्या ठिकाणी बॅग हरवली होती त्या परिसराची पाहणी केली. दुकानदारांशी आणि येणाऱ्या-जाणाऱ्या लोकांशी चौकशी केली असता एका व्यक्तीने ती बॅग उचलून नेल्याची माहिती मिळाली. पोलिसांनी तातडीने सूत्रे हलवली आणि त्या व्यक्तीचा शोध घेऊन त्याचा फोन नंबर मिळवला. त्या व्यक्तीला संपर्क साधून विचारपूस केली असता त्याने बॅग सापडल्याचे सांगितले आणि ती पोलिसांकडे जमा केली. तपासणी केली असता बॅगेत देऊळकर यांचे चार लाख रोख आणि तिन्ही चेक सुरक्षित असल्याचे आढळून आले. देऊळकर यांना पोलीस ठाण्यात बोलावून निरीक्षक हेमलता शेरेकर यांच्या हस्ते त्यांची बॅग, रोख रक्कम आणि चेक परत केले.

# कर्जतच्या फार्मसी महाविद्यालयात फार्मासिस्ट दिन

**कर्जत : प्रतिनिधी**

कोकण ज्ञानपीठ राहुल धारकर फार्मसी महाविद्यालयात कर्जत येथे जागतिक फार्मासिस्ट दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या वेळी माधवबागच्या डॉक्टरांनी विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिकासह मार्गदर्शन केले तसेच विविध स्पर्धा घेण्यात आल्या.



फार्मसी महाविद्यालयाच्या सेमिनार हॉलमध्ये कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. माधवबागच्या डॉ. तेजश्री जाधव यांच्या हस्ते उद्घाटन झाले. कार्यक्रमास डॉ. श्रद्धा सातपुते, महाविद्यालयीन विकास समिती सदस्य विजय मांडे, प्राचार्य डॉ. मोहन काळे, उपप्राचार्य डॉ. अमोल चांदेकर, डॉ. निलोफर खान, तुषार पाटील आदी उपस्थित होते. डॉ. काळे यांनी उपस्थितांचे स्वागत करून प्रस्ताविकात महाविद्यालयाचा चढता आलेख सांगितला तसेच फार्मासिस्टचे महत्त्व सांगितले.या वेळी डॉ. जाधव यांनी विद्यार्थ्यांना सीपीआर प्रशिक्षण देऊन विविध तंत्रे प्रत्यक्ष दाखवून दिली. तसेच आरोग्य जनजागृती विषयी मार्गदर्शन केले.

फार्माकोव्हिजिलन्स आठवडा आणि फार्मासिस्ट आठवडा निमित्ताने घेतलेल्या वादविवाद स्पर्धा-ब्रँडेड औषधे विरुद्ध जेनेरिक औषधे, ई-पोस्टर स्पर्धा-फार्मसीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा वापर, पोस्टर स्पर्धा-ॲण्टिबायोटिक्सचा सुरक्षित वापर, काउंटरपलीकडे फार्मासिस्टचे भविष्य, लसीकरण जनजागृती, डिजिटल युगातील फार्मासिस्ट, प्रश्नमंजुषा स्पर्धा-फार्मसीमधील सद्य:स्थितीतील प्रवाह, स्लोगन स्पर्धा-फार्मासिस्ट दिन अशा विविध स्पर्धांचे बक्षीस वितरण करण्यात आले.

दुपारच्या सत्रात डॉ. मेघना सिंह यांच्या प्रमुख उपस्थितीत नॅनो तंत्रज्ञानातील उदयोन्मुख प्रवाह आणि नवकल्पना या विषयावर माहितीपूर्ण वेबिनार आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाचे समन्वयक डॉ. अतुल त्रिपाठी, डॉ. निलोफर खान, सिद्धिका धोपे, असिया दडेल, पूजा धनगर आणि मोहसिन मन्सुरी हे होते. या वेळी विद्यार्थी, शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सण, उत्सवादरम्यान नारळाने चाळीशी गाठली

**रोहा : प्रतिनिधी**

कोकणात सर्वाधिक श्रीफळ (नारळ ) हे पीक घेत असताना आज याच नारळाने सध्या चाळीशी गाठल्याचे दिसून येत आहे. सण, उत्सवामुळे बाजारात नारळाची किंमत वाढली आहे.



शुभकार्य, सण, उत्सव जत्रा यात्रा या निमित्ताने नारळाची गरज असते. त्याशिवाय शुभकार्य पूर्ण होत नाही. राजकीय भूमिपूजन व उद्घाटन समारंभास अनेक श्रीफळ वाढविले जातात, तर कोकणातील स्वंयपाकघरातील महत्त्वाचा घटकही नारळ मानला जातो. त्यामुळे प्रत्येक वेळी नारळाची आवश्यकता लागते.

गणेशोत्सवाआधी नारळाची किंमत २० रुपयांच्या आत होती. गणेशोत्सवानंतर किंमत वाढण्यास सुरुवात झाली. आज लहान श्रीफळाची किंमत ४० रुपये असून त्यानंतर ५०, ६०, ७० अशी झाली आहे. सध्या नारळ बाजारात भाव खाताना दिसत आहे.

निसर्ग चक्रीवादळात पडलेली झाडे, कमी झालेले उत्पादन, उत्पादन प्रक्रियेत येणारा खर्च पाहता नारळाचे उत्पादन घटत असल्याचे दिसून येते. त्यामुळेच भाव वाढताना दिसत आहे.

# चौलची पांडवकालीन हिंगुळजा देवी

चौलभोवाळे पर्वतवासी दत्त मंदिरानजीक हिंगुळजा देवीचे मंदिर आहे. प्राचीन व ऐतिहासिक मंदिरापैकी एक असलेले हिंगुळजा माता मंदिरासभोवतालची कोरीव लेणी पहाण्याजोगी आहे. चौल-भोवाळे पासून फक्त अर्धा किमी अंतरावरील छोट्याशा डोंगरात देवी स्थानापन्न आहे.

एका सलग पाषाणात कोरलेले हिंगुळजा मातेचे दगडी मंदिर प्राचीन वास्तुशास्त्राचा हा उकृष्ट नमुना आहे. डोंगरावर मंदिराशेजारी असलेले बारमाही पाण्याचे दोन हौद विशेषः मानले जातात. या हौदात दान केलेले धन काशिला पोहचते अशी आख्यायिका सांगितली जाते. सुमारे १५८ पायऱ्या चढून गेल्यावर डोंगराच्या कुशीत वसलेले मंदिर व्दापारयुगातील पांडवकालीन आहे. पांडवाच्या द्युतातील पराभवानंतर अज्ञातवासाच्या काळखंडात व्दापारयुगातील रेवतीनगर म्हणजेच चौल-रेवदंडा नगरीत ३६० मंदिरे व ३६० तलाव बांधण्याचा संकल्प करून प्रति काशी निर्मितीचे काम पांडवांनी हाती घेतले होते. सहा महिने दिवस व रात्र काम करीत असताना पहाटे कोंबडा आरवू नये असा दंडक ठेवला होता. पहाटे देवीने कोंबड्याचे रूप घेतले व कोंबडा आरवला. त्यामुळे पांडवांना काम सोडून द्यावे लागले. या कोंबड्यावर पांडवांनी बाण सोडून जखमी केले आणि तो बाण हिंगुळजा मातेच्या मंदिराच्या मागील बाजूस चिन्हाने दाखविला जातो. ही देवी पांडवांची बहीण आहे, अशी पौराणिक आख्यायिका आजही येथील जुनी मंडळी सांगत असल्याचे हिंगुळजा मातेच्या मंदिरात तीन पिढ्यांची



परंपरा असलेले गुरव संतोष काटकर यांनी माहिती दिली.

भणसाळी लोकांचे आद्यदैवत हिंगुळजा देवी असल्याचे सांगितले जाते. पौष पौर्णिमेच्या यात्रेचे निमित्ताने भणसाळी लोक मुंबईहून यात्रेसाठी येतात. येथे राहण्यासाठी त्यांनी निवासस्थान उभारलेले आहे. या मंदिराचा भणसाळी समूहाचा ट्रस्ट स्थापन करण्यात आला असून मंदिराचे सुशोभीकरण तसेच देखभाल केली जाते. सद्या मंदिराचे जीर्णोद्धार होऊन सुंदर असे मंदिर भणसाळी समूहाने ट्रस्टच्या माध्यमातून उभारलेले आहे.

या डोंगरकड्याच्या आग्नेयेस पायथ्यापासून काही अंतरावर दरवाजा असलेली लहान बौध्द लेणी आहेत. बाहेर काही मीटर उंची रूंदीची सज्जा असून शेड उभारण्यासाठी भोके आहेत. या लेण्यात कसलेही कोरीव काम नाही किंवा लेख नाही. या गृहेत लागूनच पश्चिमेस काही मीटर अंतरावर दुसरी लेणी आहे. समोरची बाजू तुटलेली असून व्हरांडा अरूंद आहे. दगड चांगला नसल्याने लेण्यांचे काम अपुरे ठेवले असावे. या दोन लेण्यांप्रमाणे पश्चिम बाजूस तितक्याच उंचीवर पश्चिमाभिमुख असलेल्या हिंगुळजा देवीच्या मंदिराकडे रस्ता जातो. मंदिरांकडे पायऱ्या चढत असताना पायरीच्या उजव्या बाजूस दगडात कोरलेले एक लेणे आढळते. त्यांच्या वायव्येकडील खोदलेल्या कोपऱ्यात आशापुरी देवीचे स्थान आहे. दक्षिणेकडील भिंतीत चौरसाकृती आकराच्या दोन खोल्या आहेत. पश्चिमेकडील समोरच्या भिंतीत खिडकी आहे. लेण्याच्या बाहेर उजव्या बाजूस ३० पायऱ्या चढून गेल्यावर दगडात खोदलेली पाण्याची दोन टाकं आहेत. पायऱ्यांच्या सुरुवातीजवळ थोडे उत्तरेस दरवाजाच्या आत हिंगुळजा देवीचे मंदिर असून त्यांच्या सभोवार अरूंद मार्ग आहे. समोरच्या मोकळ्या जागेवर अलिकडे सिमेंट क्राँक्रीटचा सभामंडप बांधला आहे. त्याच्या समोर खुल्या जागेवर तुलशी वृंदावन व दीपमाळ आहे. तेथून लांबवरचा सुंदर देखावा दिसतो.

**-महेंद्र खैरे, रेवदंडा**

# कोयना प्रकल्पग्रस्तांची जानाई आणि इंजाई देवी

खालापूर तालुक्यातील कोयना जांब्रुक वावंढळ या गावची ग्रामदैवत आई जानाई व इंजाई यांची घटस्थापना अतिशय आनंदी वातावरणात आणि ग्रामस्थ यांच्या उपस्थिती झाली. सध्या दोन्ही देवींचा नऊ दिवस जागर सुरू आहे.



सातारा जिल्ह्यातील कोयना प्रकल्पामुळे विस्थापित झालेले जावळी तालुक्यातील कोयना जांब्रुक हे गाव रायगड जिल्ह्यातील खालापूर तालुक्यात मुंबई-पुणे महामार्गावर वावंढळ या महसुली गावात स्वखर्चाने वसले आहे. या गावचे भाग्यविधाते कै. जे आर कदम यांनी अतिशय सुंदर व सुनियोजित वसाहत वसवली. या वसाहतीचे मॉडेल बघण्यास लोक यायचे. येथे १९६० सालात बांधलेल्या मंदिराचा जीर्णोद्धार सुरू झाला आहे. सध्या एक छोटे मंदिर उभे केले असून मंदिर पूर्ण होईपर्यंत देवांचे वास्तव्य त्या ठिकाणी आहे.

कोयना जांब्रुक या गावातील देवीची उपासना, घटस्थापना, होळी, गौरी गणपती व सार्वजिक सण परंपरा वावंढळ येथेही सुरू आहेत. स्वयंभू पाषाण मूर्ती इंजाई मातेसमोर घटाची स्थापना होते. प्रत्यक घरातून आलेले कडधान्य दुधात भिजवून त्यावर घट बसविण्यात येतो. दिवसभर ग्रामस्थ मंदिरात असतात. पुरुष व महिला यांचे भजन होते. काही वर्षांपासून परिसरातील भजनी मंडळ येऊन भजन सेवा करतात, तर रात्री साडेनऊ वाजता ग्रामस्थ मंदिरा भोवती पाच प्रदक्षिणा घालतात. त्यानंतर गोंधळ घातला जातो. हे गोंधळी सातारा जिल्ह्यातून परंपरेने गेली ६७ वर्ष व त्यापूर्वी कोयना जांब्रुक या गावी येत असत. कोयनेवाले म्हणून ओळख असणाऱ्या गावात देवीच्या दर्शनाला अनेक भाविक येतात.

**-अर्जुन कदम, चौक**

